# अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय

# आत्मनिर्भर भारत

**PM Formalisation of Micro Food Processing Enterprises Scheme**
**(PM FME Scheme)**

**(प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे उन्नयन योजना)**

# मार्गदर्शक सूचना




नोंदणी



प्रकल्प सहाय्य हाताळणीसाठी



सविस्तर प्रकल्प अहवाल व उद्योगाचा सुधारणा आराखडा



अनुदानासाठी अर्ज




बँक जोडणी



तांत्रिक सुधारणा



शेतकरी उत्पादक संस्था/ स्वयंसहाय्यता गट/उत्पादक सहकारी संस्था सहाय्य



सामाईक सुविधा



ब्रँडींग व विपणन

-----------------------------------------

VOCAL FOR LOCAL

**व्होकल फॉर लोकल**

**(स्थानिक उत्पादनासाठी आवाज द्या)**

-----------------------------------------

सत्यमेव जयते

**अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (भारत सरकार)**
**पंचशील भवन, ऑगष्ट क्रांती मार्ग, नवी दिल्ली - ११० ०४९ वेबसाईट: www.mofpi.nic.in**

# <u>अनुक्रमणिका</u>


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी | १ ते २ |
| २ | एक जिल्हा एक उत्पादन | २ ते ३ |
| ३ | योजनेचे घटक | ३ |
| ४ | वैयक्तिक लाभार्थी | ३ ते ६ |
| ५ | गट व संस्था लाभार्थी | ६ ते ८ |
| ६ | सामाईक पायाभूत सुविधांसाठी सहाय्य | ८ ते ९ |
| ७ | ब्रँडींग व विपणन सहाय्य | ९ ते ११ |
| ८ | क्षमता बांधणी व संशोधन | ११ ते १४ |
| ९ | संस्थात्मक रचना | १५ ते २५ |
| १० | अभ्यास व अहवाल | २५ ते २६ |
| ११ | प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) | २६ ते २७ |
| १२ | निधी वितरण | २७ ते २९ |
| १३ | बँकस्तरावरील कर्ज/ निधी कार्यपध्दती | २९ ते ३० |
| १४ | माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) | ३० |
| १५ | तज्ञ संस्थांचे पॅनेल (सूची) | ३१ |
| १६ | विविध योजना एकत्रीकरण आराखडा | ३१ |


***

**१.०: पार्श्वभूमी :**

**१.१: संक्षिप्त आढावा:**

**१.१.१:** आपल्या देशात असंघटित अन्नप्रक्रिया क्षेत्रामध्ये सुमारे २५ लाख अन्नप्रक्रिया उद्योग असून, ते अनोंदणीकृत व अनौपचारिक स्वरुपाचे आहेत. या उद्योगांमध्ये केवळ ७% गुंतवणूक ही यंत्रसामग्रीमध्ये असून ३% थकित कर्ज आहे. असे असले तरी या असंघटित उद्योगाचा रोजगारातील वाटा हा ७४% (यापैकी १/३ महिला आहेत) असून उद्योगातून होणारे उत्पादन १२% तर २७% मुल्यवर्धन अन्न प्रक्रिया क्षेत्रामध्ये केले जाते. यापैकी जवळपास ६६% उद्योग हे ग्रामीण भागात असून यामधील सुमारे ८०% उद्योग कुटूंब आधारित आहेत. सदरील बहुतांश उद्योगांतील यंत्रसामुग्री मधील गुंतवणूक व उलाढाल पाहता ते सुक्ष्म उत्पादन उद्योग या प्रकारात येतात.

**१.१.२:** भारतातील असंघटित अन्न प्रक्रिया उद्योगासमोर अनेक आव्हाने असून त्यामुळे या उद्योगाच्या एकंदर विकासावर मर्यादा येतात व कामगीरीवर देखील परिणाम होत आहे. ही आव्हाने खालीलप्रमाणे आहेत.

अ) चांगल्या प्रकारची उत्पादने व पॅकेजिंगच्या दृष्टीने कौशल्यांचा अभाव तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची अनुपलब्धता यामुळे एकंदर उत्पादकता व नाविण्यपूर्णता यामधील कमतरता.

आ) अन्नाच्या दर्जातील कमतरता व अन्नसुरक्षा नियंत्रण व्यवस्था तसेच चांगल्या स्वच्छतेबाबत व उत्पादकतेच्या पध्दती बाबत प्राथमिक जागरुकतेचा अभाव.

इ) ब्रँडींग व विपणन कौशल्याचा तसेच पुरवठा साखळीशी जोडण्याच्या क्षमतेचा अभाव इत्यादी.

ई) भांडवलाची कमतरता व बँक कर्जाचे कमी प्रमाण.

**१.१.३:** असंघटित सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी सर्वंकष मुल्यसाखळीच्या दृष्टीने कौशल्य प्रशिक्षण, उद्यमशीलता, तंत्रज्ञान, कर्ज व विपणन या बाबतीत राज्य शासनाचे सक्रिय सहभाग व पाठबळाची गरज आहे. गेल्या दशकामध्ये केंद्र व राज्य शासनाने अन्न प्रक्रिया संस्था व महिलांचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करुन शेतकऱ्यांना एकत्रित करण्यासाठी व्यापक प्रयत्न केले आहेत. स्वयंसहाय्यता गटांनी काटकसर व सुमारे ९७% पर्यंत कर्जाची परतफेड करुन खूपच चांगली प्रगती केली असून, त्यांची अनुत्पादक मालमत्तादेखील खूपच कमी आहे. शासनाने स्वयंसहाय्यता गटांच्या वतीने (अन्नप्रक्रिया उपक्रमासह) विविध सेवाक्षेत्रामधील उपक्रम हाती घ्यावेत यादृष्टीने चालना देण्यासाठी व्यापक प्रयत्न केले आहेत. तथापी शेतकरी उत्पादक संस्था व स्वयंसहाय्यता गटांनी गुंतवणूक करावी व त्यांचे उपक्रम वाढवावेत यासाठी काही शासकीय योजना राबविल्या जात आहेत.

**१.१.४:** पंधानमंत्री सुक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन ही योजना केंद्र पुरस्कृत असून सुक्ष्म खाद्य उद्योगांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार केली आहे. शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व उत्पादक सहकारी संस्थांच्या क्षमता विचारात घेवून त्यांना सहाय्य करणे, उद्योगांची स्थरवृध्दी करणे व त्यांना औपचारिक दर्जा प्रदान करणे यासाठी ही योजना तयार केली आहे.

१.२: ध्येय :

१.२.१: योजनेचे ध्येय खालीलप्रमाणे :

अ) असंघटित अन्न प्रक्रिया उद्योगातील कार्यरत वैयक्तिक सुक्ष्म उद्योगांच्या स्पर्धाक्षमतेत वाढ करणे व या क्षेत्रास औपचारिक दर्जा प्रदान करणे. आणि

आ) शेतकरी उत्पादक संस्था (FPO), स्वयंसहाय्यता गट (SHG) व उत्पादक सहकारी संस्थांच्या उत्पादनांसाठी सर्वंकष मुल्यसाखळी विकसित करण्यासाठी सहाय्य करणे.

१.३: उद्देश :

१.३.१: या योजनेचे उद्देश सुक्ष्म उद्योगांची क्षमता बांधणी करुन खालील बाबींसाठी सक्षमीकरण करणे यादृष्टीने निश्चित केले आहेत.

अ) सध्या कार्यरत असलेले सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व उत्पादक सहकारी संस्थांना अधिकाधिक पतमर्यादा उपलब्ध करणे.

आ)उत्पादनांचे ब्रँडींग व विपणन अधिक बळकट करुन त्यांना संघटित अशा पुरवठा साखळीशी जोडणे.

इ) सध्या कार्यरत असलेल्या दोन लाख उद्योगांना औपचारिक रचनेमध्ये आणण्यासाठी सहाय्य करणे.

ई) सामाईक सेवा जसे की सामाईक प्रक्रिया सुविधा, प्रयोगशाळा, साठवणूक, पॅकेजिंग, विपणन तसेच उद्योगवाढीसाठीच्या सर्वंकष सेवांचा सुक्ष्म उद्योगांना अधिक लाभ मिळवून देणे.

उ) संस्थांचे बळकटिकरण तसेच अन्नप्रक्रिया क्षेत्रातील संशोधन व प्रशिक्षण यावर भर देणे.

ऊ) व्यावसायिक व तांत्रिक सहाय्याचा या सुक्ष्म उद्योगांनी अधिकाधिक लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न करणे.

१.४ : निधी तरतूद :

१.४.१: या योजनेसाठी (सन २०२०-२१ ते सन २०२४-२५) या पाच वर्षे कालावधीसाठी रु.१०,००० कोटीची आर्थिक तरतूद केली असून त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ६०:४० या प्रमाणात असेल.

१.५ : योजनेची व्याप्ती :

१.५.१: या योजनेअंतर्गत २ लाख सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांना बँक कर्जाशी निगडित अर्थसाह्य देय राहिल. तसेच या क्षेत्राच्या वृध्दीसाठी सामाईक पायाभूत सुविधा व संस्थात्मक रचनेसाठी आवश्यक ते सहाय्य करण्यात येईल.

२.०: एक जिल्हा एक उत्पादन धोरण :

२.१: या योजनेअंतर्गत एक जिल्हा एक उत्पादन हे धोरण स्विकारले असून त्यामुळे निविष्ठा खरेदी, सामाईक सेवांचा लाभ घेणे व उत्पादनाचे विपणन अधिक सुकर होणे यादृष्टीने फायदेशीर ठरणार आहे. एक जिल्हा एक उत्पादन या धोरणामुळे मुल्यसाखळी विकास व पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासाठी सहाय्यभूत ठरणार आहे. एका जिल्ह्यात एक जिल्हा एक उत्पादनाचे एका पेक्षा

जास्त समुह असु शकतात. लगतच्या जिल्ह्यातील एक जिल्हा एक उत्पादनाचा एक समुह असु शकतो.

२.२: या योजनेचा भर नाशिवंत शेतमालावर असल्याने त्यादृष्टीने राज्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी उत्पादने निश्चित करतील. त्यासाठी राज्य सरकारे प्राथमिक सर्व्हेक्षण हाती घेतील. एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार नाशिवंत कृषि उत्पादन, तृणधान्यांवर आधारित उत्पादन किंवा अन्न उत्पादन जे जिल्ह्यात व्यापक स्वरुपात घेतले जात आहे किंवा कृषिपूरक क्षेत्रातील उत्पादन असेल. या उत्पादनाच्या यादीमध्ये आंबा, बटाटा, लिची, टोमॅटो, शाबूदानाकंद, किन्नू, भुजिया (शेव), पेठा, पापड, लोणची, मिलेट आधारित उत्पादने, मत्स्यपालन, कुक्कूटपालन, मांस उत्पादन, तसेच पशुखाद्य निर्मिती इ. ना या योजनेअंतर्गत सहाय्य मिळू शकेल. याशिवाय काही पारंपारिक व नाविण्यपूर्ण उत्पादने ज्यामध्ये टाकाऊ पदार्थापासून उत्पन्न मिळवून देणाऱ्या उत्पादनाना सहाय्य करण्यात येईल. उदा. मध, आदिवासी क्षेत्रातील किरकोळ वनउत्पादने, हळद, आवळा, हळदपूड यासारखी पारंपारिक भारतीय वनौषधी खाद्य उत्पादने, इ. चा समावेश आहे. कृषि उत्पादनांवर प्रक्रिया करणे तसेच वाया जाणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण कमी करणे, उत्पादनाची योग्य पारख करणे, उत्पादनाची साठवणूक व विपणन यासाठी सहाय्य देण्यात येईल.

२.३ : सध्या कार्यरत असलेल्या वैयक्तिक सुक्ष्म उद्योगांना भांडवली गुंतवणूकीसाठी सहाय्य करण्याकरिता एक जिल्हा एक उत्पादन या धोरणानुसार जे उत्पादन निश्चित केले आहे त्याचे उत्पादन घेत असलेल्या उद्योगांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी कार्यरत उद्योग जर अन्य उत्पादन घेत असतील, तर त्यांना देखील या योजनेअंतर्गत सहाय्य केले जाईल. शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व उत्पादक सहकारी संस्थांच्या बाबतीत मात्र जे एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार उत्पादन घेत असतील तरच त्यांचा सहाय्यासाठी विचार केला जाईल.

२.४ : वर उल्लेख केलेले गट किंवा संस्थां जर अन्य उत्पादनावर प्रक्रिया करीत असतील व त्यांच्याकडे पुरेसे तांत्रिक, आर्थिक व उद्यमशील पाठबळ असेल तर सहाय्य करण्यात येईल.

२.५ : नविन उद्योगांच्या बाबतीत जे उद्योग वैयक्तिकरित्या किंवा गट व संस्थां सुरु करीत असतील तर एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार जे उत्पादन निश्चित केले आहे त्यासाठीच सहाय्य करण्यात येईल.

२.६ : सामाईक पायाभूत सुविधा तसेच उत्पादनाचे ब्रँडींग व विपणन यासाठीचे सहाय्य केवळ एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनासाठीच करण्यात येईल. राज्य व विभागीय स्तरावर उत्पादनांचे ब्रँडींग व विपणन यासाठी सहाय्य करतांना काही उत्पादने जी एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेली नाहीत त्यांचा देखील समावेश करता येईल.

२.७ : केंद्र शासनाचा वाणिज्य विभाग समुह (क्लस्टर) दृष्टिकोन समोर ठेवून कृषि निर्यात धोरणाअंतर्गत कृषि उत्पादनाच्या निर्यातीवर भर देत आहे. तसेच कृषि मंत्रालय, भारत सरकार सुध्दा जिल्ह्यातील विशिष्ठ कृषि उत्पादन जे तुलनात्मकदृष्ट्या फायदेशीर आहे ते समुह (क्लस्टर) वाढविण्याचा दृष्टीकोन ठेवून भर देत आहे. अनेक राज्यानी एक जिल्हा एक उत्पादन धोरणांतर्गत समुह

(क्लस्टर) आधारित उत्पादन विकास याचा स्विकार केला आहे. या योजनेच्या एक जिल्हा एक उत्पादन धोरणामुळे उद्योगांना सामाईक सुविधा व अन्य पुरक आधारभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे.

३.० : योजनेचे घटक:

३.१ : सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग क्षेत्राच्या गरजा विचारात घेवून या योजनेचे चार व्यापक घटक निश्चित केले आहेत.

अ) वैयक्तिक व गट/ संस्थांनी हाती घेतलेल्या सुक्ष्म उद्योगांना सहाय्य करणे.

आ) उत्पादनांचे ब्रँडींग व विपणनासाठी सहाय्य करणे.

इ) संस्थांच्या बळकटीकरणासाठी सहाय्य करणे.

ई) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मजबूत प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा स्थापित करणे.

३.२ : वर नमूद केलेल्या प्रत्येक घटकाची सविस्तर माहिती खाली दिली आहे.

४.० : वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकांना सहाय्य :

४.१ : वैयक्तिक सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना भांडवलासाठी बँक कर्जाशी निगडीत पात्र प्रकल्प किंमतीच्या ३५% पर्यंत व जास्तीत जास्त रुपये १०.०० लाख या मर्यादेत प्रति प्रकल्पासाठी अनुदान देय राहिल. लाभार्थी हिस्सा हा प्रकल्प किंमतीच्या किमान १०% असेल व उर्वरित बँकेचे कर्ज असेल.

४.२ : वैयक्तिक सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांसाठीचे योजनेअंतर्गत पात्रता निकष:

४.२.१ सध्या कार्यरत असलेले सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग प्रकल्प.

४.२.२ सध्या कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचा समावेश हा एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार राज्यस्तरीय स्थरवृध्दी आराखड्यामध्ये असावा (SLUP) किंवा निवडलेल्या संसाधन व्यक्तींनी क्षेत्रभेटीत या उद्योगांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली असावी. ज्या अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये विजेचा वापर होतो, त्यांच्या बाबतीत विजेचे बील हे सदर उद्योग चालू असल्याचा पुरावा होईल. अन्य कार्यरत उद्योगांच्या बाबतीत सध्यांच्या कार्यरत असल्यांच्या नोदी उपलब्ध असलेली यंत्र सामुग्री व इतर साहित्याची यादि व या उद्योगामधून झालेली विक्री हे सदर उद्योग चालू असल्याची खात्री होण्यासाठी उपयुक्त ठरेल.

४.२.३ सदरचा उद्योग हा असंघटित असावा व त्यामध्ये १० पेक्षा कमी मजूर काम करीत असावेत.

४.२.४ असे उद्योग हे प्राधान्याने एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निवडलेल्या उत्पादनामध्ये काम करीत असले पाहिजेत. तसेच अन्य सुक्ष्म उद्योगांचा देखील विचार केला जाईल.

४.२.५ अर्जदाराचा सदर उद्योगावर मालकी अधिकार असला पाहिजे.

४.२.६ सदर उद्योगाची मालकी ही वैयक्तिक किंवा भागिदारी स्वरुपाची असेल.

४.२.७ अर्जदाराचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असावे तसेच त्याचे/ तिचे शिक्षण किमान आठवी पास असावे.

४.२.८ एका कुटूंबातील केवळ एक व्यक्ती योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्यासाठी पात्र असेल. कुटूंबाच्या व्याख्येमध्ये स्वत: अर्जदार, त्याचा जोडीदार (पति किंवा पत्नी) व मुलांचा समावेश आहे.

४.२.९ सदर उद्योगाला औपचारिक दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी अर्जदाराची तयारी असावी तसेच लाभार्थी हिस्सा प्रकल्प किंमतीच्या १०% देण्याची व बँक कर्ज घेण्याची तयारी असावी.

४.२.१० प्रकल्प किंमतीमध्ये उद्योगासाठी आवश्यक जमिनीच्या किंमतीचा समावेश नसेल. बांधून तयार असलेले उद्योगासाठीच्या शेडची किंमत किंवा दिर्घ मुदतीने भाडेपट्टा कराराने घेतलेले शेड किंवा भाड्याने घेतलेल्या शेडच्या भाड्यांच्या रकमेचा समावेश प्रकल्प किंमतीमध्ये करता येईल. प्रकल्प किंमतीमध्ये भाडेपट्टा कराराने घेतलेल्या शेडसाठीची भाडेपट्टा कराराची रक्कम ही जास्तीत जास्त ३ वर्षांची घेता येईल.

४.३: वैयक्तिक सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांच्या निवडीची प्रक्रिया:

४.३.१ सदर योजनेअंतर्गत सहाय्यासाठी सध्या कार्यरत उद्योगांची निवड ही दोन प्रकारे केली जाईल. एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार जे उद्योग संबंधित जिल्ह्यांत निवड केलेल्या उत्पादनावर आधारित काम करतात त्यांना प्राधान्याने सहाय्य केले जाईल. अन्य कार्यरत उद्योग ज्यांची क्षमता आहे अशा उद्योगांना देखील सहाय्य केले जाईल.

४.३.२: जे उद्योजक सदर योजनेतंर्गत लाभ घेण्यास इच्छुक आहेत त्यांच्याकडून जिल्हास्तरावर अर्ज मागवले जातील. निवडलेले संसाधन व्यक्ति (Resource Person) जिल्ह्यातील विविध समुहांचे सर्वेक्षण हाती घेवून, या योजनेतंर्गत लाभ घेण्यास सक्षम उद्योगांचा शोध घेतील. ज्या उद्योजकांकडून थेट अर्ज प्राप्त होतील अशा उद्योगांना संसाधन व्यक्ति भेट देवून क्षेत्रीय पडताळणी करतील व काटेकोरपणे त्यांच्या क्षमतेचे मूल्यांकन करतील.

४.३.३: अशाप्रकारे संसाधन व्यक्तिंकडून पडताळणी करुन आलेले सक्षम उद्योगांचे प्रस्ताव व थेट आलेले प्रस्ताव जिल्हास्तरिय समितीकडे सादर केले जातील. जिल्हास्तरिय समिती संसाधन व्यक्तीकडून आलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करेल व इच्छुक व्यक्तीची मुलाखत घेईल.

४.३.४: संसाधन व्यक्तीनी प्रत्येक प्रस्तावाची खालील मुद्द्यांच्या अनुषंगाने काटेकोरपणे पडताळणी करावी.

अ) उद्योगांची वार्षिक उलाढाल.

आ) सदर उद्योगाने केलेला खर्च, देयके इत्यादि बाबतचे मूल्यांकन करावे.

इ) उद्योगाकडे सध्या उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा.

ई) उद्योगाची वृध्दी, उत्पादन व विक्रीच्या दृष्टीने विविध घटकांशी निर्माण केलेले संबंध (बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंकेज).

उ) जिल्ह्यामध्ये निश्चित केलेल्या समुहापासून त्या उद्योगाचे असलेले अंतर.

ऊ) उद्योगाच्या वतीने निर्माण केलेले विपणन (विक्री) संबंध.

**४.३.५: जिल्हा स्तरीय समिती/राज्य नोडल एजन्सी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावांसाठी संसाधन व्यक्ति सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी मदत करतील, जेणेकरुन सदर उद्योगांच्या स्थर वृध्दीसाठी त्यांना बँककर्ज घेता येईल. तयार केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित बँकांना कर्ज मंजूरीसाठी सादर केला जाईल.**

**४.४: वर दिलेली कार्यपध्दती ही नविन उद्योगांना देखील लागू असेल. तथापी एक जिल्हा एक उत्पादनासाठी केलेल्या पायाभूत सर्वेक्षणामध्ये अशा नविन उद्योगांसाठी गुंतवणूकीची गरज किंवा त्या उद्योगाची विस्तार क्षमता या बाबी दिसून आल्या पाहिजेत.**

**४.५: वैयक्तिक सुक्ष्म उद्योगांना अंतिम मान्यता देण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समिती स्तर किंवा राज्य नोडल एजन्सींना ठेवायचे याचा निर्णय राज्यसरकार घेईल. अशाच प्रकारे सामाईक पायाभूत सुविधा, ब्रॅन्डींग व विपणन यामध्ये गटांमार्फत करावयाच्या भांडवली गुंतवणुकी संदर्भातील प्रस्ताव मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये जिल्हास्तरिय समिती (DLC)/ राज्यस्तरिय नोडल एजन्सी (SNA) यांची काय भुमिका राहिल, यांचा निर्णय राज्य शासन घेईल.**

**५.०: गट व संस्था लाभार्थी :**

**५.१: या योजनेअंतर्गत गट व संस्था जसे की शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट, सहकारी उत्पादक यांना त्यांच्या उत्पादनाच्या सर्वंकष मुल्यसाखळीसाठी सहाय्य केले जाईल. सर्वंकष मुल्यसाखळीमध्ये उत्पादनाची वर्गवारी, प्रतवारी, पारखणे, साठवणूक, सामाईक प्रक्रिया, पॅकेजिंग, विपणन, शेतमालाची प्रक्रिया व तपासणी प्रयोगशाळा इ. बाबीचा समावेश राहील.**

**५.२: शेतकरी उत्पादक संस्था/ सहकारी उत्पादक :**

**५.२.१: शेतकरी उत्पादक संस्था/सहकारी उत्पादक यांना खालील प्रमाणे सहाय्य देय राहिल.**

**अ) बँककर्जाशी निगडीत ३५% निधी.**

**आ) प्रशिक्षणासाठीचे सहाय्य.**

**इ) अशा प्रस्तावांच्या बाबतीत कमाल निधी मर्यादा ही विहीत केल्यानुसार असेल.**

**५.२.२ :शेतकरी उत्पादक संस्था/ सहकारी उत्पादक यांचेसाठी पात्रता निकष:**

**अ) अशी संस्था ही प्राधान्याने एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनावर आधारित असावी.**

**आ) अशा संस्थेची आर्थिक उलाढाल ही किमान रु. १ कोटी असावी.**

**इ) प्रस्तावित प्रकल्पाची किंमत ही सध्याच्या आर्थिक उलाढालीपेक्षा जास्त नसावी.**

**ई) प्रकल्पधारक सभासदांना संबंधित उत्पादनासंबंधीचे पुरेसे ज्ञान आणि त्या उत्पादनाबाबत किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.**

**उ) शेतकरी उत्पादक संस्था/ सहकारी उत्पादक यांचेकडे प्रकल्प खर्चाच्या १०% स्वनिधी भरण्यासाठीची आवश्यक आर्थिक तरतूद असावी किंवा त्यासंबंधीची राज्य शासनाची मंजूरी असावी. याशिवाय खेळत्या भांडवलासाठी किमान सहयोग रक्कमेची (Margin money) व्यवस्था असावी.**

**५.३ : स्वयंसहाय्यता गट : (SHGs)**

**५.३.१: अनेक स्वयंसहाय्यता गट अन्न प्रक्रिया उपक्रम हाती घेत आहेत. या योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना खालील प्रकारचे सहाय्य देय राहिल.**

**५.३.२ बीज भांडवल :**

**अ) या योजनेतंर्गत स्वयंसहाय्यता गटातील प्रत्येक सभासदांना रु. ४०,०००/- याप्रमाणे बीजभांडवल व लहान उपकरणे खरेदीसाठी सहाय्य दिले जाईल.**

**आ) बीजभांडवल देत असतांना जे स्वयंसहाय्यता गट एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाशी संबंधीत गटांना प्राधान्य दिले जाईल.**

**इ) स्वयंसहाय्यता गटातील सर्व सभासद हे अन्न प्रक्रिया उपक्रमामध्ये सहभागी असतीलच असे नाही, म्हणून बीजभांडवल रक्कम स्वयंसहाय्यता गटांच्या फेडरेशन स्तरावर उपलब्ध केली जाईल.**

**ई) स्वयंसहाय्यता गटांच्या Federation ला सदरचा निधी राज्य नोडल एजन्सी (SNA)/ राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (SRLM) मार्फत दिले जाईल. स्वयंसहाय्यता गटांचे फेडरेशन स्वयंसहाय्यता गटांच्या सभासदांना सदरची रक्कम कर्ज म्हणून देईल व सभासद ती कर्ज रक्कम स्वयंसहाय्यता गटांना परतफेड करतील.**

**५.३.३: स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदास अन्न प्रक्रिया उद्योगाचा एक युनिट (वैयक्तिक लाभधारक) म्हणून कर्जाशी निगडीत ३५% निधी, कमाल रु. १० लाख च्या मर्यादेत देय राहिल.**

**५.३.४: भांडवली गुंतवणूक म्हणून स्वयंसहाय्यता गटांच्या फेडरेशनला कर्जाशी निगडीत ३५% निधी देय राहिल. अशा प्रकरणांमध्ये देय कमाल निधीची रक्कम ही विहीत करण्यात येईल.**

**५.३.५: स्वयंसहाय्यता गटांचे प्रशिक्षण व हाताळणी यासाठी सहाय्य: स्वयंसहाय्यता गटांना सहाय्य करण्यासाठी राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (SRLM) यांच्याकडे प्रशिक्षित संसाधन व्यक्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (SRLM) कडील कृषि उत्पादनामधील अनुभवी स्थानिक संसाधन व्यक्तींचा उपयोग प्रशिक्षण, उद्योगांचा दर्जा सुधारणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे व स्वयंसहाय्यता गटांना हाताळणीसाठी सहाय्य इ. साठी केला जाईल.**

**५.३.६: बीजभांडवल सहाय्यासाठी स्वयंसहाय्यता गटांसाठीचे पात्रता निकष:**

**अ) स्वयंसहाय्यता गटाचे जे सभासद सध्या अन्न प्रक्रिया उपक्रम राबवित आहेत, तेच पात्र असतील.**

**आ) स्वयंसहाय्यता गटाच्या वरिल सभासदांनी बीजभांडवल म्हणून मिळालेली रक्कम ही खेळते भांडवल म्हणून व किरकोळ उपकरणे खरेदी करण्यासाठी वापरणार असल्याची हमी संबंधित स्वयंसहाय्यता गटास व स्वयंसहाय्यता गटाच्या फेडरेशनला देणे आवश्यक आहे.**

इ) स्वयंसहाय्यता गटाच्या फेडरेशनने सभासदांना बीजभांडवल अदा करण्यापूर्वी खालील पायाभूत माहिती प्रत्येक सभासदाकडून घेणे आवश्यक आहे.

क) प्रक्रिया केल्या जाणाऱ्या उत्पादनाचा तपशील.

ख) हाती घेतलेले अन्य उपक्रम.

ग) वार्षिक उलाढाल.

घ) कच्च्या मालाचा स्त्रोत व उत्पादनाची विपणन/ विक्री.

५.३.७: स्वयंसहाय्यता गटाच्या भांडवली गुंतवणूकीसाठी कर्जाशी निगडीत निधीसाठीचे पात्रता निकष:

अ) स्वयंसहाय्यता गटाकडे प्रकल्प किंमतीच्या १०% रक्कम स्वहिस्सा म्हणून देण्यासाठी व खेळते भांडवल म्हणून २०% सहयोग रक्कम (मार्जिन मनी) देण्यासाठी रक्कम उपलब्ध असावी. ही रक्कम उपलब्ध नसेल तर राज्य शासनाची निधी मंजूरी आवश्यक.

आ) स्वयंसहाय्यता गटातील सभासदांना एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाच्या प्रक्रियेचा किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.

६.०: सामाईक पायाभूत सुविधांसाठी सहाय्य:

६.१ शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट, उत्पादक सहकारी, शासन यंत्रणा किंवा खाजगी उद्योग, यांना सामाईक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी सहाय्य केले जाईल. योजनेअंतर्गत निर्मित सामाईक पायाभूत सुविधाचा वापर अन्य युनिटसना व लोकांना देखील सुविधांच्या क्षमतेच्या भरीव प्रमाणात होण्याकरिता या सुविधा भाडे तत्वावर उपलब्ध असाव्यात. अशा प्रकल्पांची सहाय्यासाठी पात्रता ठरवित असतांना शेतकऱ्यांना व उद्योग क्षेत्रास मिळणारा लाभ, व्यवहार्यता फरक (व्हायेबलिटी गॅप), खाजगी गुंतवणूकीची अनुपलब्धता, मुल्यसाखळीची गरज इ. बाबींचा विचार करुन निर्णय घेतला जाईल. कर्जाशी निगडीत निधी हा ३५% असेल. अशा प्रकरणांमध्ये निधीची कमाल मर्यादा विहीत करण्यात येईल.

६.२: योजनेअंतर्गत सहाय्यासाठीच्या सामाईक पायाभूत सुविधा प्रकार : या योजनेअंतर्गत खालील प्रकारच्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी सहाय्य केले जाईल.

अ) कृषि उत्पादनाची वर्गवारी, प्रतवारी, साठवणूक करण्यासाठी जागा व इमारत तसेच शेतीक्षेत्राच्या जवळ शीतगृहाची उभारणी.

आ) एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाच्या प्रक्रियेसाठी सामाईक प्रक्रिया सुविधा.

इ) विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध असणारे केंद्र (इनक्युबेशन सेंटर): या केंद्रामध्ये एका किंवा समान पध्दतीच्या अनेक उत्पादनांची हाताळली केली जाईल. लहान युनिटसना भाडेतत्वावर या केंद्राचा वापर त्यांच्या उत्पादनाची प्रक्रिया करण्यासाठी करता येईल. तसेच या केंद्राचा वापर काही प्रमाणात प्रशिक्षणासाठी होईल. हे केंद्र व्यावसायिक तत्वावर चालविले जाईल.

**६.३: शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट, सहकारी उत्पादक यांना सामाईक पायाभूत सुविधा व भांडवली गुंतवणूकीसाठी सादर करावयाच्या प्रस्तावांसाठीची कार्यपध्दती**

**६.३.१: योजने अंतर्गत या प्रकारच्या प्रस्तावांना निधी प्राप्त होण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब केला जाईल.**

**अ) योजनेअंतर्गत भांडवली गुंतवणूक व सामाईक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी निधी मागणीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) हा विहीत नमुन्यात तयार केला जाईल.**

**आ) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रकल्प खर्चाचा सविस्तर तपशील, आवश्यक मनुष्यबळ, आर्थिक उलाढाल, विपणन व्यवस्था, कच्च्या मालाची उपलब्धता, अंदाजित नफा-तोटा पत्रक, जमा-खर्चाच्या रोखीच्या प्रवाहाचे पत्रक इ. चा समावेश असणे आवश्यक.**

**इ) सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय नोडल यंत्रणेस सादर करावा. सदर प्रस्तावास राज्यस्तरीय मंजूरी समितीने मंजूरी दिल्यानंतर राज्यस्तरिय नोडल यंत्रणा सदरच्या प्रस्तावाची शिफारस अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास करेल. रु.१० लाखापेक्षा अधिक रक्कमेचा सहाय्यासाठीचा गटाचा प्रस्ताव अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास (MoFPI) मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.**

**ई) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या मंजूरीनंतर सदरचा प्रस्ताव पुढे वित्तीय संस्थेस कर्ज मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.**

**उ) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये गटांच्या सभासदांच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक सहाय्याचा देखील समावेश असणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या प्रशिक्षणासाठीचे तास, प्रशिक्षण मॉड्यूल्स, व प्रशिक्षण खर्चाच्या मर्यादा याबाबत कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (MSDE) यांनी विहीत केल्यानुसार असाव्यात. योजनेअंतर्गत प्रशिक्षण व क्षमता बांधणी या घटकासाठीचा संपूर्ण खर्च दिला जाईल.**

**ऊ) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक यांना प्रति प्रकरण रु. ५०,०००/- चे सहाय्य दिले जाईल.**

**ऋ) संबंधित बँकेने अर्जदार संस्थेस कर्ज मंजूर केल्यानंतर योजनेअंतर्गत निधीचे वितरण अर्जदाराच्या बँकखात्यात वितरित केले जाईल.**

**७.०: ब्रँडींग व विपणन सहाय्य:**

**७.१: सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये सहभागी शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक किंवा एस.पी.व्ही. यांना या योजनेअंतर्गत मार्केटिंग व बँन्डीग यासाठी सहाय्य केले जाईल. एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनासाठीच विभागीय किंवा राज्यस्तरावर ब्रँडींग व विपणनासाठी सहाय्य केले जाईल.**

**७.२: सहाय्यासाठीच्या पात्र बाबी:**

**अ) योजनेअंतर्गत विपणनाशी संबंधित प्रशिक्षणासाठी संपूर्ण निधी उपलब्ध केला जाईल.**

**आ) सामाईक ब्रँड व पॅकेजिंग विकसित करणे.**

इ) राष्ट्रीय व विभागीय स्तरावरील किरकोळ विक्री साखळी व राज्यस्तरीय संस्थांशी विपणन करार.

ई) उत्पादनाचा अपेक्षित दर्जा राखला जावा यादृष्टीने गुणवत्ता नियंत्रण.

७.३: ब्रँडींग व विपणाच्या दृष्टीने सहाय्य करण्यासाठी उत्पादनाचे सामाईक ब्रँड व सामाईक पॅकेजिंग निर्माण करणे व उत्पादनाचे प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. तसेच सामाईक पॅकेजींगच्या सहभागासाठी प्रमाणीकरण करणे. सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंगसाठीची साजेशी गुणवत्ता / स्तर ही ठिकाण, उपक्रम व उत्पादन परत्वे वेगवेगळी असू शकते. हा स्तर जिल्हा, विभाग किंवा राज्यस्तर असावा याचा निर्णय राज्य नोडल एजन्सी घेईल. म्हणूनच ब्रँडींग व पॅकेजिंगच्या सहाय्याचा प्रस्ताव राज्य नोड़ल एजन्सी तयार करेल. ब्रँडींग व पॅकेजिंगसाठी एकूण खर्चाच्या ५०% रक्कम सहाय्य म्हणून देय राहिल. यासाठीची कमाल निधी मर्यादा विहीत करण्यात येईल. या योजनेअंतर्गत किरकोळ विक्री केंद्रे सुरु करण्यासाठी सहाय्य दिले जाणार नाही.

७.४: राष्ट्रीय स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या उत्पादनासाठी ब्रँडींग व पॅकेजिंगसाठी वर उल्लेख केल्यानुसार एक जिल्हा एक उत्पादन धोरणाच्या धर्तीवर सहाय्य केले जाईल. अशा प्रकारच्या सामाईक ब्रँडींग, पॅकेजिंगसाठीचे आणि विपणनासाठीचे सहाय्य राष्ट्रीय स्तरावर दिले जाईल. अशा प्रकारच्या सहाय्यासाठीचे प्रस्ताव राज्ये किंवा राष्ट्रीय स्तरावरील संस्था किंवा भागीदारी संस्था अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास पाठवतील.

७.५: पात्रता निकष:

७.५.१: प्रस्ताव सादर करीत असतांना खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे:

अ) प्रस्ताव एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनाशी संबधित असावा.

आ) उत्पादन सहाय्यासाठी पात्र होण्याकरिता अशा उत्पादनाची आर्थिक उलाढाल किमान रु. ५ कोटी असावी.

इ) अंतीम उत्पादन जे ग्राहकाला किरकोळ पॅकिंगच्या स्वरुपात विक्रीसाठी उपलब्ध असेल.

ई) अर्जदार शेतकरी उत्पादक संस्था/स्वयंसहाय्यता गट/ सहकारी उत्पादक विभागीय किंवा राज्यस्तरीय एस.पी.व्ही. असेल जी मोठ्या प्रमाणात उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणेल.

उ) उत्पादन व उत्पादक यांचा विस्तार व वाढ मोठ्या स्तरावर करणे शक्य होणार आहे.

ऊ) जी संस्था उद्योग उभारणी करणार आहे तिची व्यवस्थापन व उद्योजकीय क्षमता याबाबतचा तपशील प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

७.६: ब्रँडींग व विपणन सहाय्यासाठी अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती

७.६.१: सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे:

अ) सादर करावयाच्या प्रस्तावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करीत असतांना त्यामध्ये आवश्यक तपशील जसे की प्रकल्पाचा तपशील, उत्पादन, कार्यपध्दती, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाचे एकत्रीकरण, सामाईक ब्रँडींग व पॅकेजिंग, किंमत निश्चिती कार्यपध्दती, उत्पादनाची प्रसिध्दी, गोदाम व साठवणूक, विपणन व्यवस्था (चॅनेल), विक्री वाढविण्यासाठीचे नियोजन इ. चा समावेश असावा.

आ) ब्रँडींग व विपणन प्रस्तावांसाठीचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राज्य नोडल एजन्सी मार्फत रु.५ लाखाचे सहाय्य उपलब्ध असेल.

इ) सदर प्रस्तावामध्ये कच्च्या मालाची खरेदी ते विक्री पर्यंत टप्प्याटप्याने हाती घ्यावयाच्या उपक्रमांचा तपशील, महत्वाच्या नियंत्रणाच्या बाबी, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादनाच्या जाहिरात व प्रचार-प्रसार संबंधी पुढील पाच वर्षात राबवावयाचे उपक्रम, सहभागी होणाऱ्या उत्पादकांची संख्या व आर्थिक उलाढाल वाढवणे हा तपशील असावा.

७.६.२: प्रस्तावाच्या अंमलबजावणी संदर्भात एक करार केला जाईल ज्यासोबत व्यवसाय आराखडा जोडलेला असेल. सदरचा करार हा शेतकरी उत्पादक संस्था/स्वयंसहाय्यता गट/सहकारी उत्पादक /एस.पी.व्ही व प्रमुख खरेदीदार (असल्यास) व राज्यस्तरीय नोडल एजन्सी यांच्यामध्ये असेल. करारामध्ये उत्पादकांच्या भांडवल व सेवांच्या गरजा व त्यांच्या उत्पादनाची क्षमता आणि कौशल्य सुधार करण्यासाठी प्रस्तावित सुधारणा व बदल तसेच उत्पादकांची प्रमुख खरेदीदारांसोबत बाजार जोडणी अधिक बळकट कशाप्रकारे केली जाईल याचा तपशील असेल.

८.०: क्षमता बांधणी व संशोधन:

८.१: राष्ट्रीय स्तरावरील संस्थांना सहाय्य:

८.१.१: सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची तांत्रिक सुधारणा व त्यांना औपचारिक स्वरुप देण्याच्या दृष्टीने क्षमता बांधणी व प्रशिक्षण हा एक महत्वाचा घटक आहे. राष्ट्रीय स्तरावरील फूड टेक्नालॅाजी एंटरप्रनरशीप अँड मॅनेजमेंट (NIFTEM) व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फूड प्रोसेसिंग टेक्नालॅाजी (IIFPT) या संस्था क्षमता बांधणी व संशोधनामध्ये महत्वाची भूमिका बजावतील. या संस्था संशोधन व प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता आर्थिक सहाय्यासाठी पात्र राहतील. NIFTEM व IIFPT करिता या राष्ट्रीय स्तरावरिल संस्था व राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांच्या भागिदारीमध्ये या योजनेतंर्गत निवडलेले उद्योजक / गट / संस्था / समुह यांना प्रशिक्षण व संशोधनासाठी सहाय्य करतील. इंडियन कौन्सील फॅार ॲग्रिकल्चर रिसर्च (ICAR), कौन्सिल फॅार सायंटिफिक अँड इंडस्ट्रीयल रिसर्च (CSIR) अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय स्तरावरील विशिष्ट उत्पादनाशी निगडीत संस्था किंवा डिफेन्स फूड रिसर्च लॅबोरेटरी (DFRL) व सेंट्रल फूड टेक्नालॅाजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (CFTRI) सारख्या नामांकित संस्था या देशपातळीवर अधिक मागणी असलेल्या उत्पादनांशी निगडीत प्रशिक्षण व संशोधनासाठी सहाय्य करतील.

८.१.२: NIFTEM व IIFPT या संस्था खालील उपक्रम राबवतील.

अ) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाकरिता तसेच राज्यस्तरावरील व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांची क्षमता बांधणी व प्रशिक्षण.

आ) प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम व प्रशिक्षण मॅाड्युल्स तयार करणे तसेच राज्यस्तरावरील तांत्रिक संस्था बरोबर समन्वयातून सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग व गट/ संस्था यांच्या प्रशिक्षणांचे आयोजन करणे.

इ) प्रशिक्षकांचे प्रशिक्षण.

ई) ऑनलाईन प्रशिक्षणासाठीचे मॅाड्युल्स तयार करणे.

उ) सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांच्या वैशिष्टपूर्ण उत्पादनांसाठी आदर्श असा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.

ऊ) वैशिष्टपूर्ण सुक्ष्म उद्योगांच्या स्तरवृध्दी / सुधारणासाठी विविध प्रकारचे तंत्रज्ञान /यंत्रसामुग्री विकसित करणे.

ऋ) वरील उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने अन्य प्रशिक्षण व संशोधन संस्थांशी भागिदारी करणे.

ऌ) योजनेच्या अपेक्षांची पूर्तता व्हावी यासाठी राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांचे बळकटीकरण करणे.

८.१.३: NIFTEM व IIFPT त्यांच्या संस्थेमध्ये विहीत केल्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) स्थापन करतील. या प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये करार तत्वावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाईल. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी NIFTEM व IIFPT यांना योजनेअंतर्गत निधी उपलब्ध केला जाईल.

८.१.४: NIFTEM व IIFPT जे उपक्रम हाती घेवू इच्छितात त्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) अपेक्षित अंदाजपत्रकासह तयार करतील व अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास सादर करतील. अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय NIFTEM व IIFPT यांना अंमलबजावणी आराखड्या अंतर्गत मंजूर उपक्रमांसाठी निधी उपलब्ध करेल. सदर योजनेसाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या अधिनस्त असलेली क्षमता बांधणी व संशोधन समिती सदर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यांची तपासणी करेल आणि आंतर मंत्रालयीन उच्चधिकार समितीची मान्यता घेईल.

८.२: राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांना सहाय्य :

८.२.१: सदर योजनेसाठी राज्य शासन राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेची नेमणूक करेल. सदर संस्थेची कार्य खालील प्रमाणे असतील.

अ) राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेसाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) तयार करणे.

आ) क्षमता बांधणी व संशोधन यासंदर्भात राज्य नोडल एजन्सी मार्फत तयार करण्यात येणाऱ्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्या करिता सर्वतोपरि मदत करणे.

इ) राज्य व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांसाठी क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

ई) जिल्हा संसाधन व्यक्तींसाठी प्रशिक्षण आयोजित करणे.

उ) राज्य नोडल एजन्सींला ब्रँडींग व विपणन आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक ती माहिती व तपशील देणे.

ऊ) जिल्हा संसाधन व्यक्तींना सुक्ष्म उद्योगांची हाताळणी, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे इ. साठी सल्ला व मदत करणे.

८.२.२: योजनेअंतर्गत नेमलेली राज्यस्तरीय तांत्रिक संस्था प्रस्तावित उपक्रमांसाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करताना त्यामध्ये वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश करेल. सदर आराखडा राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या मंजूरीनंतर NIFTEM व IIFPT यांच्या सल्ल्याने अन्न प्रक्रिया उदयोग मंत्रालयास सादर करेल.

**८.२.३: राज्यस्तरीय तांत्रिक संस्था निवडीचे निकष (SLTI) : राज्यस्तरीय तांत्रिक संस्था (SLTI) ही अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानाशी संबंधित काम करणारी व कार्यरत असावी. यामध्ये खालील संस्थांचा समावेश होवू शकतो :**

**अ) राज्य कृषि विद्यापीठ किंवा अन्य विद्यापीठाच्या अख्यत्यारीत स्थापित एखादे महाविद्यालय/ संस्था.**

**आ) राज्याच्या मालकीची अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संशोधन संस्था.**

**इ) अन्न प्रक्रियेवर भर देणारी कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड रिसर्च इनस्टिट्यूट (CSIR) च्या अख्यत्यारीतील किंवा केंद्रशासनाची एखादी संस्था.**

**ई) जर ते एखादे महाविद्यालय असेल तर त्यांच्याकडे अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान संबंधीचे पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम चालू असणे व अपेक्षित प्राध्यापक वर्ग असणे आवश्यक आहे.**

**उ) संस्थेकडे सर्व सोयींनी युक्त (आवश्यक यंत्रसामुग्री / उपकरणे प्रक्रिया साधनासह) तपासणी प्रयोगशाळा असावी.**

**ऊ) संस्थेकडे विशेषत: सुक्ष्म-लहान व मध्यम उद्योजकांच्या (MSME) दृष्टीने संशोधन कार्य, उत्पादन विकसित करणे यासाठी प्राध्यापक वर्ग असणे व अन्नप्रक्रियेसाठी आवश्यक मशिनरी असणे अपेक्षीत आहे.**

**ऋ) प्रस्तावास राज्यशासनाची शिफारस असणे आवश्यक आहे.**

**ऌ) निवडलेल्या संस्थेची नोडल अधिकारी व पूर्णवेळ कामासाठी चमुची (Team) नेमणूक करण्याची तयारी असावी. नेमलेल्या चमुमध्ये किमान दोन प्राध्यापकांनी केवळ या योजनेचे पूर्णवेळ काम करणे आवश्यक आहे.**

**ऍ) या योजनेअंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्याकरिता संस्थेकडे पुरेशी बांधलेली जागा असणे आवश्यक आहे.**

**ऐ) या संस्थेमध्ये प्राधान्याने एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या राज्यातील काही उत्पादनांवर प्रक्रिया करण्यासाठीचे पथदर्शी केंद्र असावेत.**

**८.३: व्यक्ति/गट/संस्थांसाठी प्रशिक्षण सहाय्य:**

**८.३.१: योजनेअंतर्गत भांडवली गुंतवणूकीच्या सहाय्यासाठी निवडलेले वैयक्तिक/गट/संस्था यांना प्रशिक्षण सहाय्य दिले जाईल. याबरोबरच जिल्हयातील अन्य कार्यरत उद्योग ज्यामध्ये एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनावर प्रक्रिया केली जाते अशा व्यक्ति/गट/संस्थांच्या उद्योगातील संबंधित व्यक्तींना देखील प्रशिक्षण सहाय्य दिले जाईल. तसेच व्यक्ति/गट/संस्था ज्यांना या योजनेअंतर्गत ब्रँडींग व विपणनासाठी सहाय्य दिले जाणार आहे त्यांना देखील प्रशिक्षण सहाय्य दिले जाईल.**

**८.३.२.: कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (MSDE) यांनी प्रशिक्षणावर प्रतितास करावयाचा खर्चाचा दर निश्चित केला आहे. सदरचे प्रशिक्षणाचे दर व त्यासंबंधीच्या अटी या योजनेअंतर्गत आयोजित प्रशिक्षणांना लागू असतील. प्रशिक्षणाचा प्रकार व त्यासाठी द्यावयाचे तास यासंबंधीचे विहीत केलेले निकष लागू असतील.**

**८.३.३: योजनेअंतर्गत क्षमता बांधणीच्या दृष्टीने खालील बाबींवर भर दिला जाईल :**

**अ) उद्योजकता विकास, कार्यरत उद्योगाच्या दृष्टीने आवश्यक कामकाज, विपणन, उद्योगासंबंधी जमा खर्चासाठी ठेवलेले आवश्यक दस्तऐवज / अभिलेख, नोंदणी, फूड सेफ्टी अँड स्टँडर्डस ॲथॉरिटी ऑफ इंडिया (FSSAI) ची माणके, उद्योग आधार नोंदणी, वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी, उद्योगामध्ये ठेवली जाणारी सर्वसाधारण स्वच्छता इ.**

**आ) एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेले उत्पादन किंवा त्या उद्योगातून तयार होणारे अन्य उत्पादन यासंबंधी तयार केलेल्या विशेष प्रशिक्षणामध्ये. आवश्यक यंत्रसामुग्रीची हाताळणी, स्वच्छतेच्या बाबी, पॅकेजिंग, साठवणूक, खरेदी, नविन उत्पादने विकसित करणे इ. बाबींचा देखील समावेश असावा.**

**८.३.४: प्रशिक्षण पध्दती:**

**अ) योजनेअंतर्गत निवडलेल्या सर्व उद्योगांसाठी आयोजित करावयाच्या सर्वसाधारण प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रशिक्षण मॉड्यूल्सचा वापर केला जाईल.**

**आ) एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या विशिष्ट उत्पादनाशी निगडीत जिल्हा स्तरावर आयोजित करावयाचे प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील रुरल सेल्फ एम्प्लॉयमेंट ट्रेनींग इनस्टिट्यूट (RSETI) मधील पायाभूत सुविधांचा जास्तीत जास्त वापर करावा.**

**इ) प्रशिक्षण कमी तासांचे व लहान मॉड्युल्सचा वापर करुन आयोजित केले जातील. तसेच ही प्रशिक्षणे दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन साप्ताहिक पध्दतीने आयोजित केली जातील, जेणेकरुन सहभागी उद्योगांच्या व्यवसायामध्ये कमीत कमी बाधा येईल.**

**ई) निवडलेल्या उद्योगांमध्ये जी नविन मशिनरी खरेदी केली जाणार आहे त्याची हाताळणी कशाप्रकारे करावयाची, स्वच्छतेचे महत्व व उत्पादित मालाचे पॅकेजिंग या प्रशिक्षणाच्या प्रमुख बाबी असतील. त्यासाठी सध्या कार्यरत उद्योगातील लाभार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या मशिनरीची कशा प्रकारे हाताळली केली जाते याचे प्रशिक्षण जिल्ह्यातील किंवा जिल्ह्याबाहेरील उद्योगांमध्ये कमी कालावधीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण आयोजित करणे हा देखील प्रशिक्षणाचा एक महत्वाचा घटक (जो नव्याने समाविष्ट केला आहे) असेल.**

**८.३.५: हाताळणी सहाय्य: सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना नियमीत मार्गदर्शन, सहाय्य व पाठपुरावा करण्यासाठी जिल्हा/विभागीय स्तरावर संसाधन व्यक्तींना योजनेअंतर्गत सहभागी करुन घेतले जाणार आहे. अशा संसाधन व्यक्ति खालील प्रकारची कामे हाती घेतील:**

**अ) सुक्ष्म उद्योगांच्या बाबतीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, बँककर्ज मिळविणे, त्यांचे प्रशिक्षण, उद्योगांची वृध्दी व सुधारणा करणे, आवश्यक नियामक (कायद्याने बंधनकारक) मंजूऱ्या मिळविणे, स्वच्छता इ. संदर्भात मार्गदर्शन व पाठपुरावा करणे.**


**आ) प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) तयार करणे, एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनासंबंधी व समुहासंबंधीचे अभ्यास तसेच गट/संस्था यांचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक माहिती व तपशील पुरविणे.**

**इ) योजनेअंतर्गत अनुदान प्रस्ताव, वैयक्तिक सुक्ष्म उद्योग व गट/संस्था यांचे बीजभांडवल तसेच सामाईक सुविधांसाठीच्या प्रस्तावांचा शोध घेणे व मंजूरीच्या दृष्टीने सहाय्य करणे.**

**९.०: संस्थात्मक रचना:**

**९.१: सदर योजनेसाठी सर्व प्रशासकीय स्तरावर भक्कम संस्थात्मक रचना तयार केली जाईल. राष्ट्रीयस्तर, राज्यस्तर व जिल्हास्तरावर (धोरणात्मक मार्गदर्शनासाठी) योजनेची अंमलबजावणी व प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी समित्यांचे गठण केले जाईल. या समित्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयांतर्गत स्थापित राष्ट्रीय कार्यक्रम विभाग व राज्य नोडल एजन्सी यांच्या कामकाजाची पाहणी करतील. याशिवाय राष्ट्रीय कार्यक्रम विभाग व राज्य नोडल एजन्सी यांना मदत करण्यासाठी पूर्णवेळ सल्लागार व तज्ञांसह प्रकल्प व्यवस्थापन कक्ष् (PMU) स्थापित केले जातील. खालील तत्क्यामध्ये संस्थात्मक रचनेचा तपशील दिला आहे:**

**आकृती १: संस्थात्मक रचना / व्यवस्था:**




**९.२: राष्ट्रीय स्तरावरील रचना:**

**९.२.१: आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समिती:**

**९.२.१.१: राष्ट्रीय स्तरावर मा मंत्री, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली एक आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समिती (IMEC) असेल. समितीची रचना खालील प्रमाणे असेल.**

**तक्ता क्र.१: आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीची रचना:**

| अ.क्र. | रचना (सदस्य) | पदनाम |
|---|---|---|
| १ | सन्माननीय मंत्री - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार | अध्यक्ष |
| २ | सन्माननीय राज्यमंत्री - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार | उपाध्यक्ष |
| ३ | सचिव - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| ४ | सचिव - कृषि, सहकार व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| ५ | सचिव - पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, भारत सरकार | सदस्य |
| ६ | सचिव - कृषि संशोधन व शिक्षण विभाग, भारत सरकार | सदस्य |
| ७ | सचिव - मत्स्यव्यवसाय विभाग, भारत सरकार | सदस्य |
| ८ | सचिव - नागरी विकास व गृहनिर्माण विभाग, भारत सरकार | सदस्य |
| ९ | सचिव - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| १० | सचिव - कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| ११ | सचिव - सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार | सदस्य |
| १२ | अध्यक्ष - FSSAI | सदस्य |
| १३ | अध्यक्ष - राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) | सदस्य |
| १४ | ग्रामीण व कृषि विकास बँक (नाबार्ड) प्रतिनिधी | सदस्य |
| १५ | AS&FA, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य |
| १६ | निती आयोग प्रतिनिधी | सदस्य |
| १७ | अभियान संचालक - (अप्पर / सहसचिव किंवा त्यापेक्षा उच्चपदस्थ अधिकारी), अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य सचिव |

**९.२.१.२: अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समिती, प्रकल्प कार्यकारी समिती व क्षमता बांधणी व संशोधन समितीवर अन्य व्यक्तिंची सदस्य म्हणून नेमणूक करु शकते. आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीची बैठक किमान तीन महिन्यातून एकदा होईल. सदरची समिती ही धोरण ठरविणारी समिती असेल व ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत एकंदर दिशा देण्याचे व सल्ला देण्याचे काम करेल. तसेच योजनेचे संनियंत्रण करेल व योजनेच्या प्रगतीचा व कामकाजाचा आढावा घेईल.**

**९.२.१.३: आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीची कार्ये खालीलप्रमाणे असतील:**

**अ) खालील बाबींना मंजूरी देणे:**

- **क) योजनेच्या मार्गदर्शक सूचना.**
- **ख) राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या मंजूरीनंतर राज्यांनी सादर केलेले प्रकल्प अंमलबजावणी नियोजन (PIP).**
- **ग) तज्ञ संस्थांना पॅनेलवर घेणे.**
- **घ) .१० लाख पेक्षा अधिक किंमतीच्या प्रस्तावांना मंजूरी देणे.**
- **ङ) क्षमता बांधणी व संशोधनासंबंधीचे प्रकल्प अंमलबजावणी नियोजन (PIP).**

**आ) खालील बाबींचा आढावा घेणे:**

- **क) प्रकल्प अंमलबजावणी नियोजन (PIP) आढावा.**
- **ख) योजनेअंतर्गत हाती घेतलेले विविध अभ्यास.**
- **ग) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय व राज्यस्तरावरील संस्थांचे क्षमता बांधणी कार्यक्रम.**
- **घ) कौशल्य व उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत व्यक्ति/गटासाठी आयोजित केलेले प्रशिक्षण समितीकडून प्राप्त अभिप्रायानुसार प्रशिक्षण कार्यक्रम वेळेवर घेतल्याबाबतचा आढावा.**
- **ङ) राज्यस्तरावरील संस्थांच्या बळकटीकरणासाठी हाती घेतले जाणारे उपक्रम.**
- **च) वैयक्तिक/गट लाभार्थी यांच्या सुक्ष्म उद्योगांच्या प्रस्तावांसाठी देय अनुदान नोडल बँकांच्या खात्यात वेळेवर वितरीत झाले बाबत आढावा.**
- **इ) उपरोक्त मंजूरी व आढावा कामांव्यतिरिक्त आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समिती खालील उपक्रम हाती घेईल:**
- **क) योजनेचे तिमाही कालावधीचे लक्षांक निश्चित करणे व या बाबतचा आढावा घेणे.**
- **ख) आंतरमंत्रालयीन सहकार्य व एकत्रीकरणाच्या बाबींचे संनियंत्रण करणे.**
- **ग) योजनेच्या एकंदर प्रगतीची देखरेख/पाहणी करणे.**
- **घ) राज्यांनी योजनेसंदर्भात केलेल्या कामांची एकंदर देखरेख/ पाहणी करणे.**
- **ङ) योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात समोर येणाऱ्या अन्य बाबी.**

**९.२.२: प्रकल्प कार्यकारी समिती (PEC)**

**९.२.२.१: अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयामध्ये कार्यवाही स्तरावर नियमीत संनियंत्रण व योजनेच्या अंमलबजावणीसाठी ही समिती गठीत केली जाईल. या समितीमध्ये खाली दिल्यानुसार सदस्य असतील.**

**तक्ता क्र.२: प्रकल्प कार्यकारी समितीची रचना**

| अ.क्र. | रचना (सदस्य) | पदनाम |
|---|---|---|
| १ | अप्पर सचिव - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | अध्यक्ष |
| २ | अप्पर/ अतिरिक्त/सहसचिव - मंत्रालय/वाणिज्य विभाग, कृषि, ग्रामीण विकास, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, सुक्ष्म-लघु व मध्यम उद्योजक, कौशल्य विकास व उद्योजकता, नागरी विकास व गृहनिर्माण व निती आयोग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | AS & FA, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय | सदस्य |
| ४ | प्रतिनिधी- APEDA, MPEDA, NIFTEM, IIFPT, CFTRI,NHB, NHM, FSSAI, NABARD | सदस्य |
| ५ | तज्ञ - अन्न प्रक्रिया, बँकींग/फायनान्स (वित्त) व विपणन | सदस्य |
| ६ | नामनिर्देशीत व्यक्ती - भागिदार संस्था, TRIFED, NCDC, NSCFDC, and SFAC | सदस्य |

९.२.२.२: प्रकल्प कार्यकारी समितीची महिन्यातून एकदा बैठक होईल व बैठकीमध्ये खालील कामकाज केले जाईल.

अ) खालील बाबींना मंजूरी देणे:

क) आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीस मंजूरीसाठी सादर करावयाच्या सर्व प्रस्तावांची तपासणी करणे. या प्रस्तावांमध्ये राज्यांचे प्रकल्प अंमलबजावणी नियोजन, राष्ट्रीय संस्था, राज्यस्तरीय तांत्रिक संस्था व रु.१० लाख किंमतीच्या वरील प्रकल्पांचा समावेश असेल.

ख) राष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (NPMU) स्थापना.

ग) केंद्र शासनाच्या वतीने योजनेअंतर्गत प्रस्तावातील ज्या बाबींसाठी १००% हिस्सा द्यावयाचा आहे (रु.१० लाखाच्या मर्यादेत) अशा प्रकल्पांना मान्यता देणे.

घ) केंद्र शासनाच्या वतीने वैयक्तिक लाभार्थांना द्यावयाचा ६०% मॅचिंग निधीचा हिस्सा वितरीत करणे.

ङ) माहिती, शिक्षण व संवाद (IEC) प्रस्ताव.

च) माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) संबंधीचे निर्णय.

आ) खालील बाबींचा आढावा घेणे:

क) वैयक्तिक/गट/ संस्था यांच्या सुक्ष्म उद्योगांना द्यावयाच्या अनुदानाचे वितरण नोडल बँकांना वेळेत करणे, व वाढ करण्याची गरज असेल तर आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीस कळविणे.

इ) वर दिलेल्या मंजूरी व आढावा संदर्भातील कामांशिवाय प्रकल्प कार्यकारी समिती (PEC) खालील उपक्रम देखील हाती घेईल:

क) आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीने योजनेची ठरविलेली वार्षिक उदिष्टे व लक्षांक विचारात घेवून मासिक लक्षांक निश्चित करणे.

ख) पोर्टल (संकेतस्थळ) च्या सहाय्याने तसेच डॅशबोर्ड संनियंत्रणाच्या आधारे योजनेच्या प्रगतीचे संनियंत्रण करणे.

ग) आंतरमंत्रालयीन सहकार्य व समन्वय.

९.२.३: क्षमता बांधणी व संशोधन समिती:

९.२.३.१: राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण व संशोधन घटक पाहण्यासाठी एक समिती असेल. या समितीचे अध्यक्ष हे विख्यात उद्योग तज्ञ असतील. समितीमध्ये खालील सदस्य असतील.

**तक्ता क्र.३: अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयामधील प्रशिक्षण समितीची रचना**

| अ.क्र. | रचना (सदस्य) | पदनाम |
|---|---|---|
| १ | उद्योग क्षेत्रातील तज्ञ | अध्यक्ष |
| २ | कुलगुरु- NIFTEM संचालक- IIFPT | सदस्य |
| ३ | सहसचिव - अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय (कौशल्य विकास प्रशिक्षणाची जबाबदारी असलेले) | सदस्य |
| ४ | सहसचिव - कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय | सदस्य |
| ५ | अन्न क्षेत्र कौशल्य परिषदेचे (FSSC) प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | प्रतिनिधी - CFTRI / DFRL / ICAR शी संबंधित संस्था | सदस्य |
| ७ | प्रतिनिधी - ग्रामीण विकास मंत्रालय | सदस्य |
| ८ | कार्यक्रम संचालक, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय यांनी नेमलेले बँकींग/ फायनान्स (वित्त), विपणन व ब्रँडींग तज्ञ. | सदस्य |

**९.२.३.२: क्षमता बांधणी व संशोधन समितीची कामे खालील प्रमाणे असतील:**

अ) खालील बाबींना मंजूरी देणे:

- क) योजनेअंतर्गत क्षमता बांधणी व संशोधन उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शन.
- ख) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचे आणि राज्यस्तरावरील व जिल्हास्तरावरील संस्थांचे क्षमता बांधणीसंबंधीचे प्रस्ताव. सदरचे प्रस्ताव जे पुढे प्रकल्प कार्यकारी समिती / आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीस आर्थिक मंजूरीसाठी पाठविले जातील.
- ग) व्यक्ति/गट/संस्था यांच्यासाठी राष्ट्रीय व राज्यस्तरावरील संस्थांच्या वतीने दिले जाणारे प्रशिक्षण कार्यक्रम (कॅलेंडर) व अभ्यासक्रम.
- घ) संस्था स्तरावरील उद्योग वृध्दी व सुधारणांच्या दृष्टीने करावयाचा पाठपुरावा यासाठीच्या अभ्यासक्रमाचे मॉड्यूल्स व उद्योगासाठी तयार केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल.

आ) खालील बाबींचा आढावा घेणे :

- क) राष्ट्रीय, जिल्हा स्तरावरील संस्था व जिल्हा संसाधन व्यक्ति यांच्यावतीने सादर केलेल्या व मंजूरी प्राप्त झालेला प्रशिक्षण कार्यक्रम /कॅलेंडर नुसार द्यावयाचे प्रशिक्षण.

**९.२.४: राष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (NPMU):** राष्ट्रीय स्तरावर स्थापित प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये व्यावसायिक तज्ञांची करार तत्वावर नेमणूक केली जाईल. हा कक्ष अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयांतर्गत निर्माण केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रम विभागास वर नमूद केलेल्या कामकाजासाठी सर्व प्रकारचे सहाय्य करेल. या कक्षाची विशिष्ट कार्ये खालीलप्रमाणे राहतील.

अ) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व राज्य नोडल एजन्सींना विविध अभ्यास व प्रकल्प अंमलबजावणी आराखडा वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक टेम्प्लेटस तयार करणे, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, राज्य व जिल्हा यंत्रणा यांचे क्षमता बांधणीचे प्रकल्प तपासुन प्रशिक्षण समिती प्रकल्प कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी ठेवणे. त्यांच्याशी लक्ष्यपुर्वक समन्वय साधणे, मार्गदर्शन करणे व निरीक्षण करणे.

आ) राष्ट्रीय स्तरावर पोर्टल व माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) तयार करून पोर्टलवर नियमीत माहिती येईल याची खात्री करणे.

इ) राष्ट्रीय, राज्यस्तरावरील संस्था व जिल्हा संसाधन व्यक्तिंमार्फत मंजूर प्रशिक्षण कार्यक्रमानुसार दिले जाणारे प्रशिक्षणांचा पुढे प्रशिक्षण समितीकडून आढावा घेतला जाईल.

ई) राष्ट्रीय व राज्य स्तरावरील तांत्रिक संस्थांचे बळकटीकरण.

उ) राष्ट्रीय स्तरावरील पोर्टलद्वारे उद्योगांना विहीत वेळेत अनुदानाचे वितरण.

ऊ) राज्य व अन्य संस्थांनी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास मंजूरीसाठी सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे मुल्यांकन.

ऋ) गट/संस्था यांच्या सहाय्यासाठी द्यावयाच्या बीजभांडवलाची वेळेत उपलब्धता.

ऌ) राज्य नोडल एजन्सीमार्फत ब्रँडींग व विपणन आराखडे वेळेत सादर करणे.

ऍ) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची वेळेत निर्मिती तसेच संसाधन व्यक्तिंची वेळेत निवड.

९.२.५: नोडल बँक: अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय सुक्ष्म उद्योगांना अनुदान योग्य प्रकारे व विहीत वेळेत बँक खात्यात वितरीत व्हावे यासाठी नोडल बँकेची निवड करेल. नोडल बँकेची कामे खालील प्रमाणे असतील.

अ) निर्धारित लक्ष्यानुसार व्यक्ति/गट/संस्था यांच्या सुक्ष्म उद्योगांना स्थानिक पातळीवर वेळेत अनुदान वितरीत होईल यासाठीचे बँकांसोबत संनियंत्रण व समन्वय साधणे.

आ) योजनेतील लाभार्थ्यांना कर्ज मंजुर केलेल्या स्थानिक बँक शाखांमध्ये त्यांच्या बँकखात्यात केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारी अनुदान रक्कम वितरीत करणे.

९.३: राज्य स्तरावरील रचना:

९.३.१: राज्याच्या पातळीवर एक राज्यस्तरीय मंजूरी समिती असेल. ही समिती योजनेच्या अंमलबजावणीची पाहणी व देखरेख करेल. या योजनेच्या कार्यवाहीच्या दृष्टीने राज्य नोडल एजन्सी नेमणूक केली जाईल. राज्य नोडल एजन्सी व राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष सर्वतोपरी सहाय्य करेल.

९.३.२: राज्यस्तरीय मंजुरी समिती

९.३.२.१: मुख्य सचिव किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले सचिव राज्यस्तरीय मंजुरी समितीचे अध्यक्ष असतील. राज्य स्तरावरील रचनेचा तपशील खाली दिला आहे.

**तक्ता क्रं.४ : राज्यस्तरीय मंजूरी समितीची रचना**

| अ.क्र. | रचना (सदस्य) | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | सचिव - अर्थ | सदस्य |
| ३ | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव - अन्न प्रक्रिया, कृषि, उद्योग, सुक्ष्म-लहान व मध्यम उद्योग, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कौशल्य विकास | सदस्य |
| ४ | अभियान संचालक, राज्य ग्रामीण उपजिविका अभियान | सदस्य |
| ५ | राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | राज्यस्तरावरील प्रमुख तांत्रिक संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | नाबार्ड, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC), राज्यस्तरीय बँकर्स समिती यांचे प्रतिनिधी (SLBC), राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी (NCDC) | सदस्य |
| ८ | राज्य शासनाने नामनिर्देशींत केलेले बँकींग/ फायनान्स (वित्त) व विपणन/ ब्रँडींग क्षेत्रातील तज्ञ | सदस्य |
| ९ | राज्य नोडल अधिकारी | सदस्य सचिव |

**९.३.२.२: राज्य शासन इतर व्यक्तीची राज्यस्तरीय मंजूरी समितीवर किंवा जिल्हास्तरीय समितीवर नेमणूक करु शकेल.**

**९.३.२.३: राज्यस्तरीय मंजूरी समितीस खालील बाबींना मंजूरी देण्याचे अधिकार असतील.**

- **अ) सर्वेक्षण/अभ्यास.**
- **आ) राज्य नोडल एजन्सीने सादर केलेले प्रकल्प अंमलबजावणी आराखडा.**
- **इ) राज्य व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठीचे क्षमता बांधणी कार्यक्रम.**
- **ई) राज्यस्तरीय संस्था, उद्योग यांच्यासाठीचे प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम.**
- **उ) राज्यस्तरीय संस्थांचे बळकटीकरण.**
- **ऊ) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास शिफारस करावयाचे गट / संस्था यांचे अनुदानाचे प्रस्ताव.**
- **ऋ) सामाईक सुविधांसाठीचे प्रस्ताव, योजनेत सहभागी होणाऱ्या गट/संस्था व ब्रँडींग आणि विपणनासंबंधीचे प्रस्ताव.**
- **ऌ) गट / संस्था यांना द्यावयाचे बीजभांडवल प्रस्ताव.**
- **ऍ) राज्यस्तरीय मंजूरी समितीस प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये समाविष्ट विविध उपक्रमांसाठी रु.१० लाखापर्यंतच्या खर्चाचे प्रस्ताव मंजूर करण्याचा अधिकार असेल.**

९.३.२.४: वरील मंजूर अधिकाराव्यतिरिक्त मंजूरी समिती खालील उपक्रम देखील हाती घेईल:

अ) एकंदर योजनेचे लक्ष्य विचारात घेवून मासिक लक्षांक निश्चित करणे.

आ) पोर्टलद्वारे योजनेच्या प्रगतीचे संनियंत्रण करणे.

इ) अन्य संबंधित संस्थांशी ताळमेळ/ समन्वय ठेवला जात आहे याची खात्री करणे.

ई) योजनेअंतर्गत सहाय्यित उद्योगांची / सामाईक सुविधांची तपासणी होत असल्याची खात्री करणे.

९.३.३: राज्य नोडल विभाग : योजनेच्या अंमलबजावणी / देखरेखीसाठी राज्यशासन राज्यस्तरावर एका नोडल विभागाची व नोडल अधिकारी यांची निवड करेल. राज्यशासन राज्यामध्ये सुक्ष्म व समुहस्तरावरिल अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये सहभागी असलेल्या विविध विभागांची तुलनात्मक क्षमता व अनुभव विचारात घेउन नोडल विभागाची नेमणुक करेल. राज्य नोडल अधिकारी हा सचिव किंवा संचालक/ विभाग प्रमुख या दर्जाचा असेल. संभाव्य नोडल विभागामध्ये कृषि किंवा फलोत्पादन विभाग, अन्न प्रक्रिया विभाग, उद्योग विभाग, सुक्ष्म-लहान व मध्यम उद्योग विभाग व ग्रामीण विकास विभाग असू शकतात.

९.३.४: राज्य नोडल एजन्सी : प्रत्येक राज्य, राज्य नोडल एजन्सीची नेमणूक करेल. राज्य नोडल एजन्सी ही एखादे संचालनालय किंवा अभियान किंवा राज्यशासनाची एखादी संस्था असू शकते. राज्य नोडल एजन्सी ही योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने राज्यस्तरावर कार्यान्वयन यंत्रणा म्हणुन कार्यरत असेल. राज्य नोडल एजन्सीची कार्य व जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील.

अ) विविध अभ्यास हाती घेणे.

आ) प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करणे.

इ) राज्यस्तरीय तांत्रिक संस्था व जिल्हा संसाधन व्यक्तिंनी घ्यावयाच्या प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांचे संनियंत्रण करणे.

ई) राज्यस्तरीय तांत्रिक संस्थांचे बळकटिकरण करणे.

उ) जिल्हास्तरीय समितींकडून अनुदानाचे प्रस्ताव वेळेत सादर होतील याची खात्री करणे.

ऊ) सामाईक सुविधा निर्मितीसाठीचे प्रस्ताव वेळेत सादर होतील याची खात्री करणे.

ऋ) गट/संस्था यांचे बीजभांडवलासाठीचे प्रस्ताव वेळेत सादर होतील याची खात्री करणे.

ऌ) ब्रँडींग व विपणनासंबंधीचे प्रस्ताव तयार करणे.

ऍ) जिल्हा संसाधन व्यक्तिंनी उद्योगांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासंबंधी केलेला पाठपूरावा/हाताळणी व मार्गदर्शन याचे संनियंत्रण करणे.

ऎ) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची स्थापना करणे.

ए) जिल्हा संसाधन व्यक्तिंच्या निवड प्रक्रियेचे सनियंत्रण करुन मान्यता देणे.

ऐ) मंत्रालयास उपयोगिता प्रमाणपत्र व नियमीत प्रगती अहवाल विहीत नमुन्यात सादर करणे.

ऑ) योजनेसंबंधी माहिती-शिक्षण-संवाद (IEC) उपक्रम हाती घेणे.

ऒ) योजनेशी संबंधीत उपक्रम राबवित असतांना विकसित केलेल्या सर्वोत्तम पध्दती व अनुभवांची देवाणघेवाण करणे.

**९.३.५: राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (SPMU) :** राज्य नोडल एजन्सी या योजनेसाठी एक राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापित करेल. या कक्षामध्ये भरती करावयाचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करार / कंत्राटी तत्वावर किंवा/प्रतिनियुक्ती किंवा/राज्य नोडल एजन्सी स्वत:च्या कर्मचारी वर्गाची नेमणूक करेल. योजनेमध्ये या कर्मच्यांऱ्यांची नेमणूक पूर्णवेळ तत्वावर असेल. राज्य नोडल एजन्सी एखाद्या खाजगी संस्थेची राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष म्हणून स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन निवड करु शकते.

**९.३.६:** राज्य नोडल एजन्सीस योजनेच्या खर्चाच्या २% निधी हा प्रशासकीय खर्च म्हणून दिला जाईल. राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठीचा खर्च हा राज्य नोडल एजन्सी या २% प्रशासकीय खर्चाच्या निधीतून करेल. राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठीच्या कर्मचारी व त्यांची शैक्षणिक पात्रता ही विहीत केल्याप्रमाणे असेल.

**९.३.६.१:** राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची वरील परिछेद ३.३.६. मध्ये नमूद केल्यानुसार राज्य नोडल एजन्सीला सहाय्य करण्याची प्रमुख जबाबदारी असेल.

**९.३.७: जिल्हा स्तरावरील रचना:**

**९.३.७.१: जिल्हा स्तरीय समिती:** जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक जिल्हास्तरिय समिती गठीत केली जाईल. या समितीमध्ये ग्रामपंचायती, बँका, विषयतज्ञ, शिक्षण क्षेत्रातील तंज्ञ, लोकसंस्था, शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट इ.चे प्रतिनिधी असतील. जिल्हाधिकारी अन्य एखाद्या व्यक्तीचा समावेश या समितीमध्ये करु शकतील. या समितीची रचना खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | रचना (सदस्य) | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, | सदस्य |
| ३ | महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| ४ | ग्रामपंचायत सरपंच - १ | सदस्य |
| ५ | गट विकास अधिकारी - १ | सदस्य |
| ६ | व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| ७ | स्वयंसहाय्यता गट / शेतकरी उत्पादक संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | प्रतिनिधी - नाबार्ड | सदस्य |
| ९ | जिल्हा प्रतिनिधी - राज्य ग्रामीण उपजिविका अभियान | सदस्य |
| १० | जिल्हाधिकारी यांनी नियुक्त (नामनिर्देशित) केलेले इतर व्यक्ती | सदस्य |
| ११ | प्रकल्प संचालक (आत्मा) | सदस्य सचिव |

**९.३.७.२: जिल्हास्तरीय समितीची जबाबदारी खालील प्रमाणे असेल :**

- **अ) राज्य नोडल विभागाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे वैयक्तिक सुक्ष्म उद्योगांसाठीचे कर्ज व अनुदान प्रस्तावांना मंजूरी देणे.**
- **आ) गट/संस्था यांच्याकडून प्राप्त सामाईक सुविधांसाठीच्या प्रस्तावांची राज्य नोडल एजन्सीकडे शिफारस करणे.**
- **इ) सुक्ष्म उद्योगांना जिल्हा संसाधन व्यक्तिंमार्फत दिल्या जाणाऱ्या पाठपुरावा / हाताळणी सहाय्याचे संनियंत्रण करणे.**
- **ई) पोर्टलद्वारे व प्रभावी डॅशबोर्डद्वारे योजनेच्या प्रगतीचे संनियंत्रण करणे.**
- **उ) सर्व संबंधित संस्थांशी ताळमेळ / समन्वय ठेवला जात आहे याची खात्री करणे.**

**९.३.८: संसाधन व्यक्ती (Resource Person) :**

**९.३.८.१: राज्य नोडल एजन्सीच्या वतीने जिल्हा/विभागीय स्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा / हाताळणी सहाय्य देण्यासाठी संसाधन व्यक्तिंची नेमणूक केली जाईल.**

**९.३.८.२: संसाधन व्यक्तींकडे खालील शैक्षणिक पात्रता असावी :**

- **अ) नामांकित राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय विद्यापीठ / संस्था यांचे कडील अन्न तंत्रज्ञान / अन्न अभियांत्रिकी मधील पदविका / पदवी.**
- **आ) अन्न प्रक्रिया उद्योगांना तंत्रज्ञान विकसन / वृध्दी, नविन उत्पादन विकसीत करणे, उत्पादनाच्या गुणवत्तेची हमी, अन्न सुरक्षा व्यवस्थापन यासाठी सल्ला देण्यासंदर्भातील ३ ते ५ वर्षांचा अनुभव.**
- **इ) जर अन्न तंत्रज्ञान क्षेत्रातील पात्र व्यक्ती उपलब्ध नसतील तर ज्या व्यक्तिंना अन्न प्रक्रिया उद्योग, बँकींग, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रशिक्षणाचा अनुभव असलेल्या व्यक्तिंची निवड करावी.**

**९.३.८.३: संसाधन व्यक्तिंनी वैयक्तिक/गट/संस्थांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, बँककर्ज घेणे, (FSSAI च्या अन्न मानक/दर्जासह), उद्योग आधार व वस्तू व सेवा (GST) नोंदणी इत्यादिसह इतर आवश्यक नोंदणी व परवाने मिळविणेसाठी सहाय्य करणे आवश्यक.**

**९.३.८.४: संसाधन व्यक्तिंना त्यांनी प्रत्येक लाभार्थ्याला बँक कर्ज मिळवून देण्याच्या दृष्टीने जे सहाय्य केले आहे त्यानुसार मोबदला दिला जाईल. संसाधन व्यक्तीस मंजुरीनंतर प्रति बँक कर्जासाठी रु.२००००/- देण्यात येतील. यापैकी ५०% रक्कम ही बँक कर्ज मंजूरीनंतर व उर्वरीत ५०% रक्कम संबंधित उद्योगास उद्योग आधार, जी.एस.टी. नोंदणी, आधार नोंदणी, एफ.एस.एस.ए.आय. ची उत्पादन मानके (दर्जा) पूर्तता, उद्योगाची कार्यवाही व लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर अदा केली जाईल.**

**९.३.९: योजनेअंतर्गत येणारे प्रस्ताव हे कशा प्रकारे येतील व त्यांची मंजूरी प्रक्रिया कशी असेल याचा निर्णय राज्य नोडल विभाग घेईल असतील. तसेच जिल्हास्तरीय समिती, राज्य नोडल एजन्सी व राज्यस्तरीय तांत्रिक संस्था यांची खालील कार्याबाबत राज्य नोडल विभाग निर्णय घेईल.**

अ) वैयक्तिक अर्जांची यादी अंतीम करण्याकरिता (शॉर्टलिस्ट) मंजूरीचा स्तर काय असेल.

आ) राज्यस्तरावरील गट / संस्था व सामाईक पायाभूत सुविधांसाठीचे अर्ज/प्रस्ताव कशा प्रकारे प्राप्त होतील.

इ) प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम यासंदर्भात जिल्हास्तरीय समिती, राज्य नोडल एजन्सी व राज्यस्तरीय तांत्रिक संस्था यांच्यामधील निर्णय प्रक्रिया.

ई) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जिल्हास्तरिय समिती राज्य नोडल एजन्सी राज्यस्तरिय तांत्रिक संस्था यांचे दिलेले कार्य / भुमिका मध्ये बदल करण्याचे अधिकार नोडल विभागास राहतील.

९.३.१०: एकत्रीकरणासाठीच्या भागिदार संस्था:

९.३.१०.१:या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती, महिला व आकांक्षित जिल्हे तसेच शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसहाय्यता गट व सहकारी उत्पादक यांना विशेष महत्व/लक्ष दिले आहे. या क्षेत्रात खालील संस्था कार्यरत आहेत

अ) ट्रायबल कोऑपरेटीव्ह मार्केटींग डेव्हलपमेंट कार्पोरेशन (TRIFED)

आ) राष्ट्रीय अनुसुचित जाती विकास वित्त महामंडळ (NSCDFC).

इ) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC).

ई) लहान शेतकऱ्यांचा कृषि व्यवसाय संघ (SFAC).

उ) ग्रामीण विकास मंत्रालयातंर्गत राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान (NRLM).

९.३.१०.२:वर नमूद केलेल्या संस्था त्यांच्याकडील योजनांचे एकत्रीकरण करुन अनुक्रमे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती सहकारी उत्पादक, शेतकरी उत्पादक संस्था व स्वयंसहाय्यता गट या प्रकल्प / समुह यांचा शोध घेवून वर नमूद केलेल्या निधी प्रस्तावासाठी संस्था सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सहाय्य करतील व अशा प्रस्तावांचा समावेश राज्य प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये करण्यासाठी सादर करतील. तसेच या संस्था त्यांना लाभ देण्यासाठी मदत / सहकार्य करतील. राज्याच्या या उपक्रमामध्ये सहभागी होवून योजनेअंतर्गत सहाय्य केलेल्या अशा उद्योगांना हाताळणीसाठी मदत करतील. प्रत्येक भागिदार संस्था ही प्रकल्प कार्यकारी समितीची सदस्य असेल.

१०.०: अभ्यास व अहवाल:

१०.१: राज्यस्तरीय स्तरवृध्दी / सुधारणा आराखडा (SLUP): राज्य नोडल एजन्सी ही राज्यस्तरीय स्तरवृध्दी / सुधारणा आराखडा तयार करेल, ज्याचे खाली दिल्यानुसार दोन घटक असतील:

१०.१.१: आधारभूत मुल्यांकन : आधारभुत अभ्यासाचा भर हा एक जिल्हा एक उत्पादन निश्चित करण्यावर असेल. हा अभ्यास ३१ जुलै २०२० पर्यंत प्रत्येक राज्यात पूर्ण केला जावा. या अभ्यासासाठी रु.२.५ लाख ते रु.१० लाखाचा निधी राज्यांना दिला जाईल.

१०.१.२: राज्यस्तरीय स्तरवृध्दी / सुधारणा आराखडा: एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार एकदा जिल्हया-जिल्हयातील उत्पादने निश्चित झाली की, राज्यांमध्ये जिल्हयातील संबंधित उत्पादनावर

काम करीत असलेले उद्योग, शेत-स्तरावरील निरनिराळी कामे, एकूण उत्पादन (मे. टनामध्ये) व उत्पादनाचे मुल्य, तंत्रज्ञान, शेतस्तरावरील प्रक्रिया, साठवणूक, गोदाम व्यवस्था, प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची संख्या, त्या उद्योगांची माहिती इ. बाबत सविस्तर अभ्यास हाती घेतला जाईल. हा अभ्यास ३१ डिसेंबर २०२० पूर्वी पूर्ण करावा. या अभ्यासासाठी राज्यांना रु.१० लाख ते रु.७५ लाखाची रक्कम दिली जाईल. अभ्यासासंदर्भातील नियम व अटी (TOR) विहीत केल्यानुसार असतील.

१०.२: शेतकरी उत्पादक संस्था / सहकारी उत्पादक स्वयंसहाय्यता गट यांचा अभ्यास: वरील अभ्यासाबरोबरच राज्य नोडल एजन्सी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, लहान शेतकऱ्यांचा कृषि व्यवसाय संघ, TRIFED, NSCFDC यांच्या समन्वयातून हा अभ्यास हाती घेईल. राज्य ग्रामीण उपजिविका अभियान (SRLM) राज्यातील स्वयंसहाय्यता गट, सहकारी उत्पादक व शेतकरी उत्पादक संस्था यांची कार्यरतता व कार्यक्षमता पातळी यासंबंधीची माहिती संकलित करेल.

१०.३: राज्यस्तरीय स्तरवृध्दी / सुधारणा आराखड्यानुसार पायाभूत व अन्य सुविधा निर्माण झाल्यानंतर, एक जिल्हा एक उत्पादन धोरणानुसार निश्चित केलेल्या उत्पादनांची प्रक्रिया व अन्य बाबींसंदर्भात पुढील अभ्यास हाती घेतला जाईल. राज्य नोडल एजन्सीच्या वतीने करावयाच्या अन्य अभ्यासासंदर्भातील तपशील प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये समाविष्ट करुन मंजूरीसाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास खर्चाच्या अंदाजासह पाठविले जातील.

११.०: प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) :

११.१: प्रत्येक राज्य पुढील वर्षासाठीचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मागील वर्षाच्या जानेवारी मध्ये तयार करील व मंजूरीसाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास मागील वर्षाच्या ३१ जानेवारी पर्यंत पाठवतील. राज्यस्तरीय मंजूरी समिती सदर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास शिफारस करेल. सदर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा आंतरमंत्रालयीन उच्चाधिकार समितीसमोर मंजूरीसाठी ठेवले जाईल. अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय सदर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास मागील आर्थिक वर्षाच्या ३१ मार्चपूर्वी मंजूरी देईल. सन २०२०-२१ मध्ये प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सर्व राज्यांनी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास मंजूरीसाठी ३० सप्टेंबर २०२० पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

११.२: प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) मध्ये खालील तपशील असेल:

अ) राज्यातील योजनेच्या अंमलबजावणीसाठीच्या व्यवस्थेसह विविध संस्थांची निवड व त्यांना नेमून दिलेली कामे इ. तपशील.

आ) राज्य नो़डल एजन्सीच्या तपशीलासह नेमलेले/निवडलेल्या अधिकाऱ्यांची माहिती.

इ) गठीत केलेल्या राज्यस्तरीय मंजूरी समिती/जिल्हास्तरीय समितीची रचना.

ई) राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापनेचे नियोजन व नेमणूक करावयाचे मनुष्यबळ.

उ) जिल्हा संसाधन व्यक्ती नेमणूकीसाठीचे नियोजन व अन्य तपशिल.

ऊ) राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेचा तपशील.

ऋ) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्या वर्षासाठी निश्चित केलेले उपक्रम.

क) नियोजित अभ्यासाचा तपशिल व अभ्यासाची पूर्ततेची कालमर्यादा.

ख) त्या वर्षामध्ये आयोजित करावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम-विविध संस्थांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांच्या तपशीलासह.

ग) अनुदान वितरणासंबंधीचे व्यापक लक्ष्य व व्यक्ती/गट/संस्थांच्या सुक्ष्म उद्योगांची संख्या याबाबतचा तपशील.

घ) जिल्हा निहाय समुहाची व्यापक यादी.

ड) योजनेमध्ये सहभागी होणारे संभाव्य भागधारक म्हणून राज्यातील निवडलेले स्वयंसहाय्यता गट/शेतकरी उत्पादक संस्था / सहकारी उत्पादकांच्या याद्या.

च) उत्पादनांचे ब्रँडींग व विपणन आराखडे याबाबतचा गोषवारा.

छ) त्या वर्षामध्ये हाती घ्यावयाच्या सर्व उपक्रमांचे सविस्तर खर्चाचे तपशील व अंदाजपत्रक.

झ) नियोजीत उपक्रमांच्या अंमलबजावणीसंबंधीचा सविस्तर विविध टप्प्यांनुसार तपशिलवार आराखडा / (Flow Chart) तक्ता.

ज) योजनेत सहभागी होणाऱ्या संभाव्य भागधारकांचा (मॅट्रीक्स) व सहभागी होणाऱ्या व्यक्तिंची निश्चित केलेली कार्ये व जबाबदाऱ्या.

११.३: प्रकल्प अंमलबजावणी आराखडा म्हणजे विविध बाबी व उपक्रमांचे नियोजन करणे व त्यासाठीच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे हे एक कौशल्य आहे. प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याच्या मंजूरीनंतर राज्य त्यांना दिलेल्या बाबनिहाय अधिकाराच्या मर्यादेत खर्च करण्यास सुरुवात करु शकतात.

११.४: राज्यस्तरीय मंजूरी समितीस खर्चाला मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान केले असून, एका बाबीच्या प्रस्तावासाठी रु.१० लाखापर्यंत मंजूरी देता येईल. तसेच रु.१० लाखाच्या वरील प्रस्ताव असतील तर ते अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास मंजूरीस पाठविले जातील. या प्रस्तावांमध्ये रु.१० लाखाच्या वरील निधीसाठीच्या प्रस्तावांसाठीचे सविस्तर प्रकल्प अहवाल, राज्यस्तरीय तांत्रिक संस्थेचा रु.१० लाखाच्या वरील खर्च इत्यांदिचा समावेश असेल.

११.५: NIFTEM व IIFPT यांच्या बाबतीत त्यांचे प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूरीनंतर संस्थांतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार रु.१० लाखापर्यंतचा खर्च करता येईल. रु.१० लाखाच्या वरील कोणत्याही प्रस्तावांतर्गत खर्च करावयाचा असेल तर तो विशेष प्रस्ताव म्हणून अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयास मंजुरीसाठी पाठविला जाईल.

१२.०: निधीचे वितरण :

१२.१: ही योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्र व राज्ये यांच्यामध्ये संसाधनांचा हिस्सा खालीलप्रमाणे असेल.

अ) केंद्र व राज्य हिस्सा अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात असेल.

आ) हिमालयीन व उत्तरपुर्व राज्यांच्या बाबतीत केंद्र व राज्य हिस्सा ९०:१० या प्रमाणात असेल.

इ) विधीमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात असेल.

ई) विधीमंडळ नसलेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्राचा हिस्सा १००% असेल.

१२.२: खालील घटकांसाठीचा १००% खर्च केंद्राच्या वतीने भागविला जाईल.

अ) क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम.

आ) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाअंतर्गत स्थापित राष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचा प्रशासकीय खर्च.

इ) प्रशिक्षण सहाय्यांतर्गत राष्ट्रीय स्तरावर दृक-श्राव्य साधनांची खरेदी, छापील साहित्य विकसीत करणे, प्रशिक्षण मॉड्यूल्स तयार करणे इ.

ई) माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS).

उ) विविध तंत्रज्ञान व उत्पादने विकसीत करणे इ.

ऊ) राष्ट्रीय स्तरावरील भागिदार संस्थांना दिले जाणारे सहाय्य.

ॠ) राष्ट्रीय स्तरावर हाती घेतलेले जाहिरात, प्रचार-प्रसिध्दी उपक्रम.

ऌ) केंद्राने उपरोक्त शिवाय केलेला अन्य प्रकारचा प्रत्यक्ष (थेट) खर्च हा १००% अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय करेल.

१२.३: केंद्र व राज्यांनी पहिल्या वर्षी केलेले सर्व खर्च केंद्र शासन १००% देईल. असे करणे गरजेचे आहे, कारण या योजनेची सुरुवात राज्यांचे बजेट मंजूर केल्यानंतर झाली आहे, त्यामुळे पुरवणी बजेट मंजूर झाल्यानंतरच राज्ये निधी उपलब्ध करु शकणार आहेत. पहिल्या वर्षी राज्यांना केंद्राने वर्ग केलेल्या निधीतून राज्यांनी केलेला खर्च, केंद्राकडून पुढील चार वर्षांमध्ये ६०:४० प्रमाणानुसार सारख्या पध्दतीने समायोजित केला जाईल.

१२.४: मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार (PIP) राज्यांना वर्षभरात दोन हप्त्यामध्ये निधी दिला जाईल. हे हप्ते देत असतांना लगतच्या हप्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सोडून मागील दिलेल्या हप्त्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ मध्ये जो निधी वर्ग केला त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

१२.५: राज्य स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) चा प्रशासकीय खर्च, विविध अभ्यास व प्रशिक्षणाचा खर्च यासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या तिमाही मध्ये राज्यांना निधी दिला जाईल. त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) मंजूरीनंतर सन २०२०-२१ या पूर्ण आर्थिक वर्षासाठीचा निधी राज्यांना एकाच हप्त्यात दिला जाईल.

१२.७: अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती / उत्तर - पूर्व राज्यांसाठी निधीचे वाटप :

१२.७.१: या योजनेअंतर्गत अनुसुचित जाती (SC) / अनुसुचित जमाती (ST) / उत्तर-पूर्वेकडील राज्यांसाठी निधीची विशेष तरतूद केली जाईल. हा निधी त्या त्या राज्यातील अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीची लोकसंख्या विचारात घेवून वितरीत केला जाईल. अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीसाठी या योजनेअंतर्गत वितरीत निधीचा लाभ अनुसुचित जाती व अनुसुचित

जमातीच्या वर्गाच्या मालकीच्या उद्योगांसाठीच करता येईल. गट / संस्थांच्या उद्योगांच्या बाबतीत अशा निधीचा वापर ज्या गट / संस्थेमध्ये ५०% पेक्षा अधिक सभासद अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीचे असतील तर करता येईल. उत्तर-पूर्वेकडील राज्यांच्या बाबतीत वाटप केलेल्या निधीचा विनियोग त्या त्या राज्यांचे निधी वापराबाबतचे प्रचलित नियम व अटी नुसार केला जाईल.

**१३.० : निधीसाठीची बँकस्तरावरील कार्यपध्दती :**

१३.१: या योजनेअंतर्गत मुख्य खर्च हा सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना रु.१० लाखाच्या मर्यादेत कर्जाशी निगडीत दिल्या जाणाऱ्या ३५% निधीचा आहे. याशिवाय गट/संस्था यांना देखील भांडवली गुंतवणूकीसाठी ३५% व सामाईक सुविधांच्या निर्मितीसाठी बँककर्जाशी निगडीत ३५% निधी दिला जाणार आहे. हा निधी कर्ज देणाऱ्या बँकांकडे उद्योगांसाठी कर्ज मंजूर केल्यानंतर वर्ग केला जाईल.

१३.२: योजनेअंतर्गत दिली जाणारी अनुदान रक्कम स्थानिक बँकांना वितरीत करण्यासाठी व त्या बँकांशी संपर्क व समन्वय ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एका नोडल बँकेची नेमणूक केली जाईल.

१३.३: कर्ज मंजूर करणारी बँक शाखा प्रत्येक लाभार्थीच्या नावावर एक मिरर (Mirror) खाते उघडेल. कर्ज देणारी बँक मंजूर कर्ज मंजुरीबाबतची वस्तुस्थिती राष्ट्रीय स्तरावरील नोडल बँकेस कळवेल. यासंबंधीच्या प्राप्त माहितीच्या आधारे केंद्र व राज्य शासन अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात त्यांचा हिस्सा नोडल बँकेस वर्ग करतील. नोडल बँक केंद्राच्या निधीचा ६०% हिस्सा व राज्याच्या निधीचा ४०% हिस्सा एकत्रितपणे संबंधित कर्ज देणाऱ्या बँक शाखांकडे वर्ग करेल. कर्ज देणारी बँक सदर निधी लाभार्थ्याच्या मिरर बँक खात्यांत वर्ग करेल. संबंधित कर्ज देणारी बँक शाखा मंजूर कर्ज त्यांच्या प्रचलित पध्दतीनुसार लाभार्थी/पुरवठादार यांना वितरीत करेल.

१३.४: कर्जाचा शेवटचा हप्ता वितरीत केल्यानंतर जर तीन वर्षांनंतर लाभार्थीचे बँकखाते चालू असेल व उद्योग चालू असेल तर ही निधीची रक्कम लाभार्थ्याच्या बँकखात्यावर जमा केली जाईल. जर लाभार्थी बँकखाते कर्ज वितरीत करण्याच्या तारखेनंतर तीन वर्षापर्यंत चालू नसेल (एन.पी.ए) तर निधीची रक्कम लाभार्थीची कर्ज परतफेड म्हणून बँक समायोजित करेल. जर एखाद्या चालू (स्टँडर्ड) बँकखात्यात निधीची रक्कम कर्जाची परतफेड म्हणून तीन वर्षानंतर वर्ग केली असेल तर कर्ज घेणाऱ्यास त्या रकमेवर व्याज भरावे लागणार नाही. सदरचे व्याज कर्ज मंजुर करणाऱ्या बँकेस ज्या तारखेस सदरचा अनुदान निधी मिळाली असेल त्या तारखेपासून कर्ज घेणाऱ्यास व्याज भरावे लागणार नाही.

१३.५: क्रेडीट गॅरंटी ट्रस्ट फॉर मायक्रो अँड स्मॉल एंटरप्राईजेस (CGTMSE) या संस्थेच्या नॅशनल क्रेडीट गॅरंटी ट्रस्टी कंपनीमधून त्यांच्या लाभार्थ्यांला प्रचलित नियम व अटींनुसार या योजनेअंतर्गत दिलेल्या कर्जासाठी पतहमीचा लाभ लाभार्थ्यांला घेता येईल. तसेच इंटरेस्ट सबव्हेन्शन स्किम फॉर इनक्रिमेंटल क्रेडीट टू एम.एस.एम.ई. २०१८ या योजनेअंतर्गत शिल्लक कर्ज रक्कमेच्या व्याजावर २% सूट (व्याजमाफी) कर्जदारांना घेता येईल.

**१३.६:** **योजनेअंतर्गत बँकांना सादर केले जाणारे प्रस्ताव हे मासिक किंवा तिमाही पध्दतीने एकत्रीत (अनेक प्रस्ताव एकाचवेळी) सादर न करता नियमीतपणे सादर केले जातील याची राज्य नोडल एजन्सीने खात्री केली पाहिजे.**

**१३.७:** **बँक शाखांना प्रस्ताव पाठवित असतांना अर्जदाराची प्राथमिक ओळख (KYC) कागदपत्रांसह सादर करावेत. तसेच कर्ज मंजूरीचा कालावधी कमी करण्यासाठी बँकेला सादर करावयाच्या प्रस्तावांसोबत ज्या जागेवर प्रकल्प उभा करावयाचा आहे / यंत्र सामुग्री उभी करावयाची आहे त्या जागेसंबंधीचा भाडेपट्टा करार/ मालकीसंबंधीचे कागदपत्र, उद्योग नोंदणी, आवश्यक त्या सर्व शासन मंजूऱ्या इ. कर्ज मंजूरीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करावीत. प्रस्तावामध्ये प्रकल्पाशी संबंधित सविस्तर माहिती द्यावी. सादर केले जाणारे सविस्तर प्रकल्प अहवाल हे स्थानिक आर्थिक परिस्थितीशी (व्हायेबिलिटी) सुसंगत असावेत.प्रकल्पांचा खर्च हा प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता त्यांचे वाजवी मुल्यांकन करुन त्या आधारावर वास्तववादी असावा.**

**१४.०:** **माहिती व्यवस्थापण प्रणाली (MIS) :**

**१४.१:** **या योजनेचे एकंदर संनियंत्रण, उपक्रम व अन्य बाबीसंदर्भातील सर्व माहिती, प्रस्तावांना दिली जाणारी मंजूरी इ. महिती ही ऑनलाईन पध्दतीने माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये संकलित केली जाईल. योजनेसाठीची माहिती व्यवस्थापन प्रणाली अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय विकसित करेल. खालील माहितीची अदान-प्रदान/मंजूऱ्या या प्रणालीवर होतील.**

**अ)** **राज्यांनी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) साठीचे पाठविलेले प्रस्ताव व त्यामध्ये अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने केलेल्या काही बदलांसह प्रस्तावांना दिलेल्या मंजूऱ्या.**

**आ)** **राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण संस्थांनी पाठविलेले प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) चे प्रस्ताव त्यामधील बदलांसह दिलेल्या मंजूऱ्या.**

**इ)** **वैयक्तिक सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांनी पाठविलेले कर्जप्रस्ताव/कर्ज.**

**ई)** **सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) अपलोड करणे व हाताळणीसाठी केलेल्या सहाय्यांचा तपशील.**

**उ)** **वैयक्तिक उद्योगांना दिलेल्या प्रशिक्षण सहाय्याचा तपशील.**

**ऊ)** **बँकांना सादर करावयाचे कर्जप्रस्ताव.**

**ऋ)** **बँकानी मंजूर केलेल्या कर्जाचा तपशील अपलोड करणे.**

**ऌ)** **व्यक्ती, यंत्रणा गट / संस्थां याना कोणत्याही प्रकारची अदा केलेली रक्कम व ठेवलेले हिशोब.**

**ऍ)** **प्रशिक्षण व हाताळणी यासंबंधी कोणतीही व्यक्ती/गट/संस्था यांना दिलेल्या सहाय्याचा तपशील.**

**ऎ)** **योजनेअंतर्गत निवडलेल्या व्यक्ती व गट/संस्था यांच्या खर्चासंबंधी खातेवही (खतावणी) ठेवणे आवश्यक आहे. सदरच्या खातेवहीमध्ये व्यक्ती/गट/संस्था यांना मिळालेले सहाय्य, त्यांचे आर्थिक उपक्रम, कर्ज वितरण (मिळालेले कर्ज) इ.चा तपशील असेल.**

ए) राज्य नोडल एजन्सी/अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय यांनी व्यक्ती/गट/संस्था इत्यादि यांना केलेल्या सर्व अदायगीची माहिती या प्रणालीमध्ये नोंद केली जाईल. तसेच योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या सर्व उपक्रमांची नोंद या प्रणालीमध्ये केली जाईल.

ऐ) माहिती व्यवस्थापण प्रणाली अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय विकसीत करेल. ही प्रणाली विकसित करण्यासाठी येणारा सर्व खर्च अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय या योजनेअंतर्गत करेल.

**१५.०: तज्ञ संस्थांचे पॅनेल (सूची) तयार करणे:**

१५.१: विपणन, संशोधन, उत्पादन विकसन, पॅकेजिंग, ब्रँडींग, प्रशिक्षण, हाताळणी सहाय्य इ. क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ञ अशा शासकिय व खाजगी संस्था मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या प्रत्येक बाबीसाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय राष्ट्रीय स्तरावर तज्ञ संस्थांचे पॅनेल तयार करील व त्यांच्या सेवांचा लाभ राज्यांना घेता येईल. या संस्थांची निवड करीत असतांना त्यांचा संबंधित क्षेत्रातील असलेल्या अनुभवाचे मुल्यमापन करण्यासाठी पारदर्शक पध्दतीचा अवलंब केला जाईल. राज्यांना या संस्थांची निवड करीत असतांना त्यांच्याकडून संबंधित कामासाठीचे आर्थिक प्रस्ताव मागवून त्यांची नेमणूक करता येईल.

**१६.०: एकत्रीकरण आराखडा:**

१६.१: या योजनेअंतर्गत सहाय्यासाठी निवडलेले अन्न प्रक्रिया उद्योग खालील शासकीय योजनांचा लाभ घेण्यास पात्र असतील.

अ) राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान - बीज भांडवल सहाय्य, प्रशिक्षण व हाताळणी सहाय्य व स्वयंसहाय्यता गटांसाठी व्याजातील सूट.

आ) स्टार्ट-अप ग्राम उद्योजकता कार्यक्रम (SVEP) - ही राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान अंतर्गत केंद्रशासन पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत ग्रामिण भागातील स्टार्ट-अप ना भांडवल पुरवठा व प्रशिक्षण व हाताळणीच्या माध्यमातून तांत्रिक सहाय्य दिले जाते. समुदाय उद्योजकता निधी (CEF) च्या माध्यमातून वैयक्तिक उद्योजकांना १२% व्याजदराने रु.१ लाखाचे कर्ज व गट/संस्था यांच्या उद्योगांना रु.५ लाखाचे कर्ज दिले जाते.

इ) सुक्ष्म-लहान व मध्यम उद्योजक २०१८ नुसार व्याजसुट योजनेअंतर्गत शिल्लक कर्जावरील व्याजाच्या २% इतके व्याज सूट दिली जाते.

ई) क्रेडीट गॅरंटी ट्रस्ट फंड फॅार मायक्रो अँड स्मॅाल एंटरप्रायजेस (CGTMSE) मार्फत रु.२ कोटीपर्यंत विना तारण कर्ज दिले जाते.

उ) पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत रु.१० लाखापर्यंतचे कर्ज दिले जाते.

ऊ) स्किम फॅार प्रमोशन ऑफ इनोव्हेशन, रुरल इंडस्ट्री अँड एंटरप्रनरशीप (ASPIRE) योजना.

ऋ) ग्रामीण उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठीची निधी योजना (SFURTI).

ऌ) सुक्ष्म-लहान व मध्यम उद्योजक यांच्यासाठीची सार्वजनिक खरेदी/धोरण (PPP).

ऍ) अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयातंर्गत इतर योजना उत्पादन व विपणन जोडणी (बॅकवर्ड फॉरवर्ड लिंकेजेस), कृषि उत्पादन समुह, शितसाखळी योजना इ. योजनांचा लाभ समुह/गट/संस्था यांना होवू शकतो.

ऐ) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) व राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान जर त्यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या कक्षेत येत असेल तर स्वयंसहाय्यता गटांना कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ देता येईल. उद्योगांमध्ये कमी कालावधीचे प्रत्यक्ष (ऑनसाईट) विशिष्ट उद्देशाने तयार केलेल्या (टेलर-मेड) प्रशिक्षणाचा लाभ राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान (NRLM) व प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचे उन्नयन योजना (PMFME) या योजनेअंतर्गत सहाय्य मिळू शकेल.

* * *